कर्नाटक सरकार

# माय–मराठी

# 10

## मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक

MARATHI FIRST LANGUAGE

Part - 1

### इयत्ता दहावी

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bangalore - 560 003.

# PREFACE

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF – 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF – 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities.
- learning to shift from rote methods.
- enriching the curriculum beyond textbooks.
- learning experiences for the construction of knowledge.
- making examinations flexible and integrating them with classroom experiences.
- caring concerns within the democratic policy of the country.
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries- integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach.

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

The most important objectives of teaching language are listening, speaking, reading, writing and reference work. These skills have been given a lot of importance in all the language textbooks. Along with the inculcation of these skills, fundamental grammar, opportunities for learners to appreciate beauty and imbibe universal life values have been integrated in language textbooks. When learners master these competencies, they would stop studying textbooks for the sake of passing examinations. In order to help learners master these competencies, a number of paired and group activities, assignments and project work have been included in the textbooks. It is expected that these activities would help learner

master communicative skills. Ultimately, it is expected that students master the art of learning to learn and make use of these competencies in real life. Textbooks for students X have a special significance. As any other new textbook they help learners' master skills and competencies and at the same time there is going to be a public examination based on them.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks. A few works of some writers and poets have been included in these textbooks. The textbook society is extremely grateful to them for giving their consent for the inclusion of these pieces in the textbooks.

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

**Prof G S Mudambadithaya**
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# पुस्तकाचे अंतरंग

विद्यार्थी / शिक्षक बंधूनो !

दहावीसाठीचे प्रथम भाषा मराठी (माय मराठी) पुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला खूप आनंद होत आहे. दहावीचे हे पाठ्यपुस्तक तयार करताना आम्हाला पुरवलेल्या अभ्यासक्रमाचा आधार आम्ही घेतला आहे.

पाठयपुस्तकाची रचना 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २००५' च्या आधारे केली आहे.

मराठी साहित्य समृद्ध आणि प्रचंड आहे. साहित्याच्या सर्व प्रकारांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकात उमटवणे कठीण आहे. तरीही विविध प्रवाह, प्रकार, कालखंड यांचे प्रतिनिधित्व करणारे गद्य-पद्य-वेचे या पुस्तकात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

दहावीचे वर्ष म्हणजे शैक्षणिक प्रवासाचा व आयुष्याचाही महत्वाचा टप्पा! त्यासाठी परीक्षामंडळाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी जास्त प्रश्न देण्याचा प्रयत्न केला आहे. जोडया जुळवा, पर्याय निवडा यासारखे प्रश्न दिले नाहीत. शिक्षक व विद्यार्थ्यांनी असे प्रश्न स्वतःच तयार करावेत.

जागतिक पातळीवर भारताची प्रतिष्ठा निर्माण करणाऱ्या व्यक्तिंचा परिचय व्हावा म्हणून चरित्र, व्यक्तिचित्र, आत्मचरित्राचा समावेश केला आहे.

शक्य तेवढे संदर्भ, टीपा, शब्दार्थ देण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि शिक्षकांनी मूळ पुस्तक व इतर सुचविलेले संदर्भ मिळवून अभ्यासावेत म्हणजेच, त्यांचे अध्यापन परिणामकारक होईल.

पाठ निवडतांना स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समस्या, पर्यावरण, वृक्षसंवर्धन, अभ्यासासाठीचे कष्ट. या गोष्टींचा विचार केला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या जाणिवा सर्व बाजूंनी समृद्ध व्हाव्यात हा दृष्टिकोनही आहे. त्यामधून यश मिळवायचे असेल तर शील व कष्टाला पर्याय नाही हा मुद्दा अधोरेखित व्हावा ही इच्छा.

मराठी भाषेची परंपरा ध्यानात यावी म्हणून संतसाहित्य, पंडितीकाव्य, विरहिणी, मुक्तछंद यांचा समावेश केला असून त्यात अगदी पहिले मराठी पुस्तक 'विवेकसिंधु' मधील वेच्यांचा समावेशही केला आहे.  व प्राचीन अर्वाचीन गद्य यांचाही समावेश आहे.

या पुस्तकाची काठिण्यपातळी ८ वी ९ वीच्या पुस्तकापेक्षा थोडी अधिक ठेवणे भाग होते. तथापि शब्दार्थ, टीपा यांच्या सहाय्याने अध्यापन सुकर होईल अशी अपेक्षा आहे. शुद्धलेखन सुधारण्यासाठी 'हे शब्द असेच लिहा' यातून हा शुद्धलेखन सुधारण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

एकूण आपले पाठ्यपुस्तक सुंदर, विश्वासार्ह व परिपूर्ण व्हावे यासाठी आम्ही प्रयत्न केले आहेत. तथापि अभ्यासकांनी काही सुधारणा सुचविल्यास त्या स्वागतार्ह ठरतील.

विद्यार्थ्यांनो! तुम्हाला, व शिक्षकांना ही 'मायमराठी' आवडली तर श्रम सार्थकी लागले, असे वाटेल. हे पुस्तक तयार करताना वरिष्ठ शासकीय अधिकारी यांनी आम्हाला सर्वतोपरी स्वातंत्र्य दिले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद !

आपले उतारे, कविता समाविष्ट करण्यास ज्यांनी परवानगी दिली त्या लेखक, प्रकाशक, संपादक यांचेही आभार.

**अध्यक्ष**
**अपर्णा शंकर पटवर्धन**
**-पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# Text Book Committee

**Chairperson :**

**Smt. Aparna S. Patwardhan,** Asst. Teacher, Jadhavaji Anandji Vidyalaya, Tal. Athani, Dist. Belagavi.

**Members :**

1. **Shri Shivaji N. Bhadavankar,** , Retd. Head Master, Kudremani High School, Kudremani, Tal.Dist. Belagavi.
2. **Shri Madhukar M. Lohar,** Asst. Teacher, The Valkart Academy, Gokak Falls, Gokak, Dist. Belagavi.
3. **Shri Shashikant B. Gurav,** Asst. Teacher, Sanmati Vidyamandir, Sidnal, Tal. Chikodi, Dist. Belagavi.
4. **Shri Shailesh R. Dani,** ,Asst. Teacher, Shri Hari Vidyalaya, Ugar Khurd, Tal. Athani, Dist. Belagavi

**Scrutinizer :**

**Dr. Vinod Gayakwad,** Professor & Chairman, Rani Channamma University, Vidya Sangam, NH-4, Belagavi.

**Artist :**

**Shri Prakash S. Naik**, Drawing Teacher, S.A.P. Vidyamandir, Kanagala, Tal. Hukkeri, Dist. Belagavi.

**Chief Co-ordinator :**

**Prof. G. S. Mudambadithaya,** Co-ordinator, Curriculum Revision and Text Book Preparation, Karnataka Text Book Society, Bengaluru, Karnataka.

**Chief Advisors :**

**Shri. Narasimhaiah,** Managing Director, Karnataka Text Book Society, Bengaluru.

**Smt. C.Nagamani,** Deputy Director, Karnataka Text Book Society, Bengaluru.

**Programme Co-ordinator :**

**Smt. Chandrakala,** ADPI, Karnataka Text Book Society, Bengaluru - 85

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರಿಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

JA. ±. µiÈzÊU0q
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–03

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–03

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

**ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು**

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

**ಅಧ್ಯಕ್ಷರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

**ಸದಸ್ಯರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ. ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ. ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ, ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್. ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

**ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:**

**ಶ್ರೀ ಎಂ. ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ** : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–03.

**ಶ್ರೀಮತಿ ಎಂ. ಡಿ. ಉಷಾ** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–03.

**ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:**

**ಎಲ್. ಶಂಕರೇಗೌಡ,** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು–03.

# अनुक्रमणिका

गद्य


| अ. क्र. | पाठाचे नाव | साहित्य प्रकार | लेखक/ लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | अनंतशक्ति परमेश्वरु | प्राचीन गद्य | केसोबास | 1 |
| 2. | वसईचा वेढा | बखर | कृष्णाजी विनायक सोहनी | 5 |
| 3. | विद्यार्थ्यांनो, जागृत व्हा! | वैचारिक | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 10 |
| 4. | नोकर? छे! मालक | विनोदीकथा | चिं.वि.जोशी | 14 |
| 5. | मनाचे पिंजरे | लघुनिबंध | अनंत काणेकर | 21 |
| 6. | जपानी स्त्री | प्रवास वर्णन | इंदू साक्रीकर | 25 |

| अ. क्र. | कवितेचे नाव | साहित्य प्रकार | कवी/ कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | पैल तो गे काऊ कोकताहे | प्राचीन पद्य | ज्ञानेश्वर | 31 |
| 2. | रुक्मिणीचे श्रीकृष्णांस पत्र | पंडिती काव्य | नरेंद्र | 34 |
| 3. | भला जन्म हा! | लावणी (आध्यात्मिक) | शाहीर रामजोशी | 40 |
| 4. | पाहुणे | विडंबन | केशवकुमार | 44 |
| ♦5. | गाऊ त्यांना आरती | विभूती गौरव | यशवंत | 49 |
| ♦6. | या भारतात बंधुभाव | देशभक्तिपर | संत तुकडोजी | 54 |
| | व्याकरण, लेखन, | | | 58 |


©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ–1 : अनंतशक्तिः परमेश्वरु

**केसोबास**

**परिचय :**

केसोबास उर्फ केशिराज बास (तेरावे शतक)

महानुभाव पंथातील हे ज्येष्ठ ग्रंथकार, संस्कृत पंडित. महानुभाव पंथाचे दुसरे आचार्य नागदेवाचार्य यांचे पट्टशिष्य. त्यांच्या सूचनेवरुन केसोबास यांनी मराठीत ग्रंथरचना केली. पंथाचे तात्विक अधिष्ठान दृढ बनविण्यात त्यांचे योगदान असून, महानुभाव साहित्यात त्यांनी मोलाची भर टाकली आहे.'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश', 'लापणिक', 'दृष्टांतपाठ', 'गुढे' या त्यांच्या मराठीतील ग्रंथ रचना. तसेच 'रत्नमालास्तोत्र', 'ज्ञानकलानिधीस्तोत्र' 'दृष्टांतस्तोत्र' या संस्कृत रचना त्यांनी केल्या आहेत.

महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांनी लीळाचरित्रात दृष्टांत कथेच्या रूपात जो उपदेश केला. त्यातील दृष्टांतांचे संकलन केसोबास यांनी इ.स. 1285 च्या सुमारास 'दृष्टांतपाठ' या ग्रंथात केले. प्रथम सूत्र त्यानंतर दृष्टांत आणि शेवटी दार्ष्टांतिक असा या ग्रंथातील रचनाक्रम आहे. दृष्टांतकथामुळे पंथातील गहन तत्त्वज्ञान सर्वसामान्यांसाठी सोपे झाले आहे.

या उताऱ्यात परमेश्वर स्वरुपाचे वर्णन करण्यासाठी समर्पक दृष्टांत दिला आहे. हा दृष्टांत डोमेग्राम येथे चक्रधर स्वामीनी म्हाईंभटास सांगितला.

हा उतारा विनायक लक्ष्मण भावे यांच्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथातून घेतला आहे.

**(मूल्य – ज्ञान, उत्सुकता)**



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सूत्र - सर्वज्ञे भणितलें: अनंतशक्तिः परमेश्वरुः सकळांसीही निश्चये व्यवस्था करितीः ।।1।।

दृष्टांत - गावां हस्ती आलाः तैं जात्यंध हस्तीतें पाहों गेलेः एके पावो देखिलाः एकें सोंड देखिलीः एकें कानु देखिलाः एके पाठीं देखिलीः एके पोटु देखिलें: एकें पुंस देखिलें: मग एकुमेकेंसी संवादतिः हा रे तुवां हस्ती देखिलाः पावो देखिला तो भणे हस्ती खांबासारिखाः । सोंड देखिली तो भणे हस्ती मुसळासारिखाः

कानु देखिला तो भणे हस्ती सुपासारिखाः। पाठी देखिली तो भणे हस्ती भिंतीसारिखाः। पोटु देखिले तो भणे हस्ती कोथळेया सारिखाः। पुंस देखिले तो भणे हस्ती खराटेंया सारिखाः। ऐसें एकमेकाउरोधीतिः तेयांमध्यें डोळसु असेः। तो भणे हा हस्तीचा एकेकु अवयेवु होयेः पर हस्ती नोहेः। एवं अवयेवीं युक्त तो हस्तीः।।

दार्ष्टांतिक - तैसें जेयांसी जे शक्ती प्रकाशली असे तो तिये शक्तितें परमेश्वरु भणेः ज्ञानिया असे तो भणे हे ईश्वराची एकेकी शक्ति होयेः परः परमेश्वरुः नोहेः ऐसा शक्तियुक्त तो परमेश्वरुः।।3।।

## शब्दार्थ व टीपा :

● हस्ती - हत्ती ● जात्यंध - जन्मापासून अंध ● पूंस - शेपूट ● भणितले - म्हणाले ● सर्वज्ञ - श्रीचक्रधर स्वामी ● दृष्टांत - दाखला, उदाहरण ● पावो - पाय ● मुसळ - धान्य सडण्याचे एक साधन ● उरोधिती - आपलेच म्हणणे खरे म्हणून वाद घालणे

टीप : दार्ष्टांन्तिक म्हणजे दृष्टांताचे तात्पर्य किंवा सार. (वरील कथेचे)

प्रमाण मराठीत अर्थ : श्री चक्रधर स्वामी म्हणाले,

सूत्र : ''ज्याचा जो अनुभव असेल तसा तो बोलतो. अनंत शक्तिमान असलेला परमेश्वर सगळ्यांसाठी विषयव्यवस्था करीत असतो''

दृष्टांत : गावात हत्ती आला असता त्याला पहायला जन्मांध लोक गेले. एकाने पाय पाहिला. एकाने सोंड पाहिली. एकाने कान पाहिला. एकाने पाठ पाहिली. एकाने पोट पाहिले. एकाने शेपूट पाहिले. मग ते एकमेकांना विचारु लागले 'अरे तू हत्ती पाहिलास. तर तो कसा आहे?' ज्याने पाय पाहिला त्याने म्हटले, 'हत्ती खांबासारखा!' सोंड पाहिलेला म्हणाला, 'मुसळासारखा' कान पाहिलेला म्हणाला 'हत्ती सुपासारखा!' पाठ पाहिली होती तो म्हणाला, 'हत्ती भिंतीसारखा!' ज्याने पोट पाहिले होते तो म्हणाला, 'हत्ती कोथळ्यासारखा!' शेपूट पाहणारा म्हणाला, 'खराट्यासारखा!' अशा रीतीने ते एकेमेकांस विरोध करुन आपलेच म्हणणे खरे म्हणत होते. त्यांच्यामध्ये एकजण डोळस होता. तो म्हणाला, ''हा हत्तीचा एक एक अवयव झाला. हा सगळा हत्ती नव्हे. अशा सर्व अवयवांनी युक्त तो हत्ती होय.''

दार्ष्टान्तिक (तात्पर्य): अशा प्रकारे ज्याला जी शक्ती प्रकाशली, त्या शक्तीलाच तो परमेश्वर मानतो. ज्ञानी मनुष्य मात्र म्हणतो की ही परमेश्वराची एक एक शक्ती होय, पण परमेश्वर नव्हे. अशा सर्व शक्तींनी युक्त असा परमेश्वर असतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) हत्तीला पाहण्यासाठी कोण गेले?

(2) सोंड पाहणाऱ्यास हत्ती कसा वाटला?

(3) शेपूट पाहणाऱ्यास हत्ती कशासारखा वाटला?

(4) सर्वांसाठी विषयव्यवस्था कोण करतो?

(5) हत्ती सुपासारखा असे कोणत्या अंधाला वाटले?

**प्र.2 खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(1) पाय पाहणाऱ्या आंधळ्याला हत्ती .............. सारखा वाटला.

(2) 'पोट' पाहणाऱ्यास हत्ती .............. सारखा भासला.

(3) हत्ती भिंतीसारखा असे .............. पाहणारा म्हणाला.

(4) सर्वज्ञ म्हणजे ............... होय.

(5) आंधळ्यांना हत्तीचे खरे स्वरूप .............. ने समजावून सांगितले.

**प्र.3 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.**

(1) हत्तीचा पायः खांबासाखा : : हत्तीची शेपूट : ...............

(2) म्हाईंभट : चक्रधरस्वामी : : केसोबासः ...............

**प्र.4 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला?

(2) या कथेचे तात्पर्य कोणते?

(3) आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''जात्यंध हस्तीतें पाहो गेले''

(2) ''तो भणे हा हस्तीचा एकेकु अवयेवु होये''

(3) ''अनंतशक्ती परमेश्वरुः सकळांसीही निश्चये व्यवस्था करितीः''

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**प्र.6 खालील प्रश्नाचे सात ते आठ ओळीत उत्तर लिहा.**

(1) या कथेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास**

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा.
अनंतशक्ती, सर्वज्ञ, परमेश्वर.

(2) खालील शब्दांचा संधी विग्रह करुन प्रकार ओळखा.
जात्यंध, परमेश्वर.

**उपक्रम :**

- तुमच्या शिक्षकांकडून महानुभाव पंथाबद्दल अधिक माहिती मिळवा.
- हा उतारा नाट्यरूपात तुमच्या वर्गात सादर करा.

**शुद्धलेखन :**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अंकुरित | अत्याधुनिक | अतिरिक्त |
| असहिष्णुता | अद्वितीय | अनुसरण |

******

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# पाठ–2 : वसईचा वेढा

कृष्णाजी विनायक सोहनी

A7A2Q3

**परिचय :**

कृष्णाजी विनायक सोहनी (1784-1854) यांनी 'पेशव्यांची बखर' हा एकमेव ग्रंथ लिहिला आहे. उत्तर पेशवाई पाहिलेल्या आणि समकालीन राजकारणात वावरलेल्या या माहितगाराने पेशवेकुलाची ही जीवनगाथा आत्मीयतेने व समरसतेने लिहिलेली आहे. बखर वाङ्मयाला इतिहासात अस्सल साधनाचा दर्जा नसला तरी काही प्रमाणात ते इतिहासाशी सुसंगत असते. यातील चित्रदर्शी वर्णने, रंगीत आख्यायिका वेगळाच नाट्यानुभव देतात. या पाठाचा प्रकार 'बखर वाङ्मय' असून 'पेशव्यांची बखर' या मधून हा पाठ निवडला आहे.

(मूल्य - लढाऊवृत्ती)

चिमाजी अप्पा कोकणपट्टीला स्वारीला निघाले. ते कोकणात येऊन तळा, घोसाळा, अवचितगड, बिरवाडी, करनाळा, रेवदंडा, बेलापूर, साष्टी असा मुलुख आपले कबजात आणून आपला अंमल चालता केला. पुढे मुलुख काबीज करावा अशा बेताने जाऊन वसईला लागले. तेथे अंमल फिरंग्यांचा तेव्हा जाऊन शह दिला. परंतु किल्ला समुद्रात. एक अंग खुष्कीला. त्यासमयी अप्पासाहेब यांणी जहाजे तयार करून आरमार जमवून समुद्रातून लढाईचा उद्योग केला. तीन वर्षे वसई भांडली. किल्ला हस्तगत होता दिसत नाही; मनुष्य फार कामास आले. नऊ लाख बांगडी फुटली. लढाईचा मोठा प्रसंग केला. परंतु  किल्ला हस्तगत होता दिसत नाही. चिमाजी अप्पा यांचा तर किल्ला घेण्याचा निश्चय मोठा. तेव्हा सर्व सरदार आपले जमा करुन त्याजला अप्पासाहेब बोलले की, ''किल्ला हस्तगत होत नाही याजकरिता मजला तोफेचे तोंडी बांधून माझे डोके तरी किल्लयात पाडावे नाही तर किल्ला घ्यावा'' तेंव्हा सर्व सरदार यांणी आप्पासाहेबास सांगितले की ''जो आपला निश्चय झाला तोच नेम आमचा आहे परंतु काहीतरी किल्लयातील भेद समजल्याशिवाय किल्ला हस्तगत होणे कठीण''. यासाठी याचा विचार करून काही तरी मसलत काढली पाहिजे. मगच दुसरा विचार किल्ला घेण्याचा ठरवू. आधी किल्ल्यातील भेद आणावा.

तेव्हा सर्वांनी विचार करून खंडोजी माणकर यांसी गुराखी करून त्यांणी किल्ल्यात जाऊन गुरे राखावयाची चाकरी  पत्करली. रोज किल्ल्यात जाऊन लोकांची गुरे चारावयास न्यावी, आणि फिरून किल्ल्यात पावती करावी, असा क्रम माणकर यांणी चालविला. दुसरे आंजुरकर पंचकळशे सुतार सरदार होते, त्यांणी सुतारकाम करावयास किल्ल्यात जावे आणि लोकांच्या घरी सुतारकाम करावे. दुल्लबाजी मोरे सरदार होते, त्यांणी कासारपण पत्करून रोज किल्ल्यातील लोकांचे बायकांस किल्ल्यात जाऊन बांगड्या भरुन बाहेर येत जावे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

या प्रमाणे तिघांनी किल्ल्याचा भेद आणल्यावर आपले लष्करातून सुरुंग खणून, किल्लयाचे बुरुजाखाली सुरुंग नेऊन, त्यांत दारूचे बुधले भरुन बत्ती दिली. तेव्हा तो बुरुज उडाला. तो मागती जागचे जागी बुरुज बसला. नंतर दुसरा सुरुंग पाडावयास काम चालविले. त्यासमयी किल्ल्यातील फिरंगी याची बायको जहाजात बसून बाहेर निघाली. ते पाहून सरकारची जहाजे धावून फिरंग्यांचे जहाज धरिले आणि त्या बायकोस श्रीमंतांकडे आणिली व ती बहुत देखणी व रुपवान होती म्हणून श्रीमंतास दाखविली त्यांणी पाहून आपले लोकांस बोलले की ''ही कशाला धरून अणिली?'' असे बोलून तिला साडी चोळी नेसवून सोडून दिली. तेव्हा ती माघारी जाऊन आपले नवऱ्यास तिने वर्तमान सांगितले की, ''तुम्ही त्यांशी कशासाठी भांडता? तो पुण्यवान आहे. मी तेथे गेले असता मला वाकडे दृष्टीने पाहिले देखील नाही, तेव्हा त्याशी लढून यश येईल असे दिसत नाही, व तुम्हास दुसरेकडून कुमकही येत नाही'' असा तिणे उपदेश केला. याजकरिता गलिमांशी सल्ला करून, स्नेह ठेवून, आपले खटल्यासुद्धा निघून जावे. या प्रमाणे ठरल्यावर फिरंगी यांणी श्रीमंत यांजकडे बोलणारा पाठवून तह केला की, ''आमचे पदरी कारकून आहेत त्यांचा सांभाळ करावा, आणि आम्हास आठ दिवसाची मुदत द्यावी. म्हणजे आम्ही आपला सरंजाम घेऊन जातो आणि किल्ला तुमचे हवाली करतो'' त्याजवरून अप्पासाहेब यांणी कबूल करून त्यांचे पदरचे कारकून होते, त्यांसी दरसाल 36 रुपये व पंधरा मण भात याप्रमाणे देऊ त्यांजकडे कामकाज सांगणार नाही व ते तुमचे जातीचे लोकास बिगार सांगणार नाही'' असे ठरल्यावर फिरंगी यांणी आपली सर्व वस्तभाव, सारे खटले, आपले जहाजात भरून किल्ल्यातून निघून गेले. पुढे अप्पासाहेब यांणी किल्ल्यांत शिरून भगवे झेंडे किल्ल्यावरती चढविले. वसईखाली नवलक्षांचा मुलुख होता तितक्या मुलुखाचा अंमल चालता केला. असा गुजराथपावेतो अंमल बसवून श्रीमंत अप्पासाहेब माघारी घेऊन वसईवर मुक्काम केला. तेथे आल्यानंतर लढाईत लोक जखमी झाले होते. त्यांस कित्येकांस पालख्या दिल्या व कित्येकांस गाव इनाम दिले. कित्येकांस जमिनी दिल्या. बालपरवेशी पडलेल्या लोकांची चालविली. ज्यास संतती नव्हती त्यांची नानापरवेशी चालविली. असा सारा बंदोबस्त करून शंकराजी केशव फडके यांजकडे वसई सरसुभा सांगितला. असा बंदोबस्त करून श्रीमंतांची स्वारी पुण्यास येऊन, बाजीराव साहेब यांस सारा मजूकर सांगून, साताऱ्यास जाऊन शाहू महाराज यास भेटून, मुलूख सर केला. हा मजकूर शाहूमहाराजांस सांगून चिमाजी अप्पा पुण्यास आले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### शब्दार्थ व टीपा :

•स्वारी -आक्रमण • अंमल - वर्चस्व, ताब्यात असणे •बोलणारा - मध्यस्थ •मुलुख - प्रदेश • फिरंगी-पोर्तुगीज • शह देणे -आक्रमण करणे • खुष्की -जमिनीवरील मार्ग •आरमार - नौदल •भांडणे - युद्ध करणे • वसई - हा ठाणे जिल्ह्यातील भुईकोट किल्ला हा 1536 साली पोर्तुगीजांनी बांधला. तो दोनशे वर्षे त्यांच्याच ताब्यात होता. • नऊ लाख बांगडी फुटणे - युद्धात अनेक पुरुष मरण पावणे • हस्तगत होणे - जिंकणे • भेद - रहस्य • मसलत - युक्ती • कासारपण - बांगड्या भरण्याचा व्यवसाय • बुधले - रांजण • सुरुंग - जमिनीत लांब, रुंद, खोल खणणे • वर्तमान - बातमी • कुमक - सैन्याचे सहाय्य • खटले - कुटुंबासहित • पंधरा मण भात - 900 किलो • तह - बोलणी, करार • वस्तभाव- दागदागिने अलंकार •सरसुभा सांगणे- सुभेदार म्हणून नेमणे

टीपाः

- चिमाजी अप्पा - बाजीरावाचा धाकटा भाऊ. याने कोकणघाट आणि किनाऱ्यावर मराठी सत्तेचा भगवा फडकवत ठेवला.
- तळा, घोसाळा - तळेघोसाळे, अवचितगड, बिरवाडी हे किल्ले मराठ्यांनी सिद्दीकडून जिंकून घेतले. व करनाळे, बेलापुर, रेवदंडे, साष्टी (ठाणे) हा भाग पोर्तुगीजांपासून घेतला.

  तीन वर्षे वसई भांडली - वसई हा ठाणे जिल्ह्यातील किल्ला 1536 साली पोर्तुगीजांनी बांधला तो दोनशे वर्षे त्यांच्याच ताब्यात होता इ. स. 1737 ते 1739 या काळात मराठयांनी वसई घेण्याचे प्रयत्न केले (अखेर 17 मे 1739 ला किल्ला घेतला.)
- आंजूरकर - गंगाजी नाईक आणूजूरकर यांनी चिमाजीआप्पास वसईच्या मोहिमेत सहाय्य केले त्याबद्दल आणूजूर (ता. भिवंडी, जि. ठाणे) हे गाव इनाम मिळाले.
- खंडोजी माणकर - पेशव्यांनी कोकणात केलेल्या लढायात हा आपल्या पराक्रमाने प्रसिद्धीस आला. त्याच्या शौर्याबद्दल खरवली (ता. माणगाव, जि. रायगड) या त्याच्या राहत्या गावासह आणखी काही गावे इनाम मिळाली.
- फिरंग्याची बायको - हा प्रसंग शिवकाळातील कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेस शिवाजीराजांनी चोळी बांगडी करून पाठवून दिले. त्या प्रसंगाची आठवण करून देतो.
- पालख्या - शूर सरदारांना पालखीत बसण्याचा दिला जाणारा मान.
- बालपरवेशी - लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार, जमीन इत्यादी.
- नाना परवेशी - लढ़ाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या संततिहीन पत्नीस तिच्या निर्वाहापुरता दिलेला पगार, जमीन इत्यादी.
- शाहू महाराज यांस भेटून - वसईच्या वेढयाची हकीकत चिमाजीच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकण्याची छ. शाहूंची इच्छा होती तथापि चिमाजी अप्पांची प्रकृती खालावलेली असल्याने प्रत्यक्ष भेटण्याऐवजी सारी हकीकत त्यांनी पत्राने कळविली.
- बाजीरावसाहेब - (1720 ते 1740) बाळाजी विश्वनाथचा पुत्र. थोरले बाजीराव पेशवे व राऊ म्हणून परिचित. संभाजी पुत्र शाहूच्या पदरी हा पराक्रमी पेशवा होता.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) चिमाजी अप्पा कोणत्या स्वारीला निघाले?

(2) वसईवर कोणाचा अंमल होता?

(3) वसईचा किल्ला कोठे होता?

(4) वसईचा किल्ला घेण्यासाठी अप्पासाहेबांनी किती वर्षे प्रयत्न केले?

(5) खंडोजी माणकरने कोणते कार्य पत्करले?

(6) किल्ल्यात सुतारकाम करण्यास कोण गेले?

(7) फिरंग्याची बायको कशी होती?

(8) वसईमध्ये किती लाखाचा मुलुख होता?

**प्र.2 खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(1) किल्ला समुद्रात एक अंग .............. ला.

(2) किल्ल्यातील .............. समजल्याशिवाय किल्ला घेणे अवघड.

(3) भेद आणल्यावर किल्ल्याच्या बुरुजाखाली .............. नेला.

(4) असे बोलून फिरंग्याच्या बायकोस ............... नेसवून सोडून दिले.

(5) तुम्हास दुसरीकडून .............. येत नाही.

(6) आम्हाला .............. दिवसांची मुदत द्यावी.

(7) अप्पासाहेब यांनी किल्ल्यात शिरून .............. चढविले.

(8) लढाईतील जखमी लोकांना .............. दिल्या.

(9) लढाईत पडलेल्या लोकांची .............. चालविली.

(10) चिमाजीअप्पा साताऱ्यास जाऊन .............. ना भेटून आले.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**प्र.3 खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) चिमाजीआप्पांनी कोकणात कोणकोणता मुलूख जिंकला?

(2) चिमाजीअप्पांनी कोणता निश्चय केला?

(3) सर्व सरदारांनी चिमाजीअप्पांना काय सांगितले?

(4) फिरंग्याची बायको पाहून श्रीमंत काय म्हणाले?

**प्र.4 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) फिरंग्याची बायको नवऱ्याला काय म्हणाली?

(2) फिरंग्याने तहात काय सांगितले?

(3) लढाईतील जखमी लोकांसाठी व इतरांसाठी श्रीमंतांनी काय केले?

**प्र.5 खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) माणकर, आंजूरकर आणि मोरे सरदारांनी काय केले?

(2) लढाईत जखमी झालेल्यांची काळजी कशी घेतली जाई?

(3) फिरंग्याने श्रीमंतांकडे कोणता तह केला?

प्र.6 संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''मजला तोफेच्या तोंडी बांधून माझे डोके तरी किल्ल्यात पाडावे.''

(2) ''तुम्ही त्यांशी कशासाठी भांडतां? तो पुण्यवान आहे.''

(3) ''आमचे पदरी कारकून आहेत त्यांचा सांभाळ आपण करावा.''

प्र.7 खालील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

(1) वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजीअप्पांनी कोणकोणते प्रयत्न केले?

(2) वसईच्या किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले?

भाषाभ्यास :

(1) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
काबीज करणे, शह देणे, हस्तगत होणे, हवाली करणे.

(2) खालील वाक्यातील काळ ओळखा.
(1) चिमाजी अप्पा कोकणपट्टीला स्वारीला निघाले.

(3) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.
(1) चिमाजी अप्पा पुण्यास आले.
(2) माझे डोके किल्ल्यात पाडावे.

उपक्रम :

- शिवाजी राजांच्या वेळी बहिर्जी नाईक हा उत्तम हेर होता त्याची माहिती मिळवा.
- 'शर्थीनं राज्य राखलं' हे कॅप्टन बेलवलकर यांचे पुस्तक वाचा.
- विविध जलदुर्गांची चित्रे जमवून माहिती लिहा.

शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| मुद्रांकित | नामांकित | रेखांकित |
| शब्दांकित | संरक्षित | अनसूया |

****

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ–3 : विद्यार्थ्यांनो, जागृत व्हा !

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

B1A8L5

**परिचय :**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (1891-1956) हे - स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री, भारतीय घटनेचे शिल्पकार, दलितांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण करणारे क्रांतिकारक महापुरुष. आयुष्यभर ज्ञानसाधना करून कायदेशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इ. ज्ञान शाखांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. दलितांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या पुरस्काराने सन्मानित केले. 'मूकनायक', 'जनता' या नियतकालिकांचे ते संस्थापक होते. तसेच 'हू वेअर दि शूद्राज'?, 'थॉटस् ऑफ् पाकिस्तान', 'बुद्ध ॲण्ड हिज धम्म' हे ग्रंथ त्यांनी लिहिले. या पाठाचा प्रकार 'वैचारिक निबंध आहे'.

हा पाठ म्हणजे 1938 साली पुणे येथील अकराव्या अस्पृश्य-विद्यार्थिसंमेलनात डॉ. आंबेडकरांनी केलेल्या अध्यक्षीय भाषणाचा संपादित भाग आहे.

(मूल्य - शिक्षणप्रेम)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विद्यार्थ्यांनो ! माझे आयुष्य सध्या खेड्यापाड्यातील अशिक्षित, अडाणी, जुलमाने त्रस्त झालेल्या लोकांचीं गाऱ्हाणी ऐकून ती निवारण्याच्या खटपटीत जात आहे. त्यामुळे विद्यार्थी वर्गाकडे जसे लक्ष द्यावयास पाहिजे तितके देण्यास अवसर सापडत नाही, पण त्यामुळे मी विद्यार्थिवर्गाकडे दुर्लक्ष करतो असा काहींचा समज झाला आहे. माझे पहिले दैवत विद्या होय. विद्येशिवाय माणसाला शांतता नाही. आणि माणुसकीही नाही. विद्या ही महासागरासारखी आहे. ती सर्वांना अवगत झाली पाहिजे. बुद्धाने एकदा म्हटले आहे की बुद्ध धर्म हा शुद्ध धर्म आहे. येथे भेदभाव नाही. श्रमण, भिक्षु, ब्राह्मण, भंगी मग ते कोणीही असोत. जसे यमुना, गंगा, ब्रह्मपुत्रा, गोदावरी नदी कोणतीही असो. ती आपल्या प्रांतातून सागरात गेली की त्यांचं पाणी एक झालं. मग हे पाणी यमुनेचे की गोदावरीचे हे सांगता यायचं नाही. माझा संघ महासागराचा आहे. ज्याप्रमाणे माणूस जगायचा असला तर अन्नाची आवश्यकता असते. तशीच विद्येचीही आवश्यकता असते. ज्ञानाशिवाय माणूस काहीही करू शकणार नाही.

आज हिन्दुस्थानात हजारो लाखो निरक्षर आहेत. मीही अपार वेदना, त्रास सोसून विद्या संपादन केली आहे. म्हणूनच मला विद्येचे भयंकर वेड आहे. आज माझ्याजवळ 20,000 पुस्तके आहेत. आहेत का कोणाकडे अशी पुस्तके? जो मनुष्य पुस्तकांवर प्रेम करील तेव्हाच तो विद्येचा खरा पुजारी होईल. मी विद्येची पूजा 24 तास करतो.

माझे दुसरे दैवत विनय आहे, मी कोणाची याचना केली नाही. माझं ध्येय असं होतं की माझं पोट भरलं पाहिजे, आणि माझ्या लोकांची सेवा केली पाहिजे. त्यामुळे पोयवाडीच्या नाक्यावरच्या 18 व 50 नंबरच्या खोलीत मी कण्याभात आणि भाकरी खाल्ली आणि समाजसेवा केली. पण भारी पगाराच्या नोकरीकडे वळलो नाही.

तसेच आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही. त्यामुळेच मी नेहमी म्हणत असतो की मी जे करीन ते होईल. अर्थात मी हे सर्व आत्मविश्वासावर अवलंबून म्हणत असतो. ही माझी घमेंड नाही. कारण त्यावेळी मुंबईच्या डिपार्टमेंटच्या चाळीत दहा फूट लांब, दहा फूट रूंद अशा खोलीत आई-बाप-भावंडे यांच्यासह राहून एक पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला आहे. अनेक संकटांना मी तोंड दिले आहे. ते या आत्मविश्वासाच्या जोरावर! इंग्लंडमध्ये असताना ज्या अभ्याक्रमाला 8 वर्षे लागतात तो अभ्यास मी 2 वर्षे 3 महिन्यात यशस्वी तऱ्हेने पुरा केला. हे करण्यासाठी मी 21 तास अभ्यास केला आहे. आज चाळीशी उलटून गेली तरी 24 तासांपैकी 18 तास खुर्चीवर बसून काम करीत असतो. पण चिमूटभर तपकीर, सिगरेटस् यांची या वयातसुद्धा मला गरज भासत नाही. म्हणूनच मी म्हणतो की दीर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यशप्राप्ती होते.

विद्यार्थ्यांनो..! विद्येबरोबर आमच्यात शील पाहिजे. शीलाशिवाय विद्या फुकाची आहे. मी आयुष्यात कोणाची फसवणूक, आत्मसिद्धीसाठी पाप केलेले नाही. विलायतेत जाऊनही मी कसलंही व्यसन केलं नाही. विद्या हे शस्त्र आहे. एखाद्याजवळ विद्येचं शस्त्र असेल व तो शीलवान असेल, तर त्यायोगे तो एकाचे संरक्षण करील. तर तोच इसम शील नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करील. विद्या ही तलवारीसारखी आहे. परंतु तिचे महत्व तिला धारण करणाऱ्यावर अवलंबून राहील कारण अडाणी माणूस कोणाला फसवू शकत नाही. पण शिकल्या सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्यासाठी लागणारा युक्तिवाद असतो. त्यामुळे खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे ते भासवू शकतात. लबाडी करण्यास चातुर्य व बुद्धी लागते. परंतु चातुर्य व बुद्धी हिला सदाचाराची अर्थात शीलाची जोड मिळाली तर तो लबाडी, फसवाफसवी करू शकणार नाही. म्हणून शिकल्या सवरलेल्या लोकांत शीलाची अत्यंत जरूरी आहे. शीलाशिवाय शिकलेले लोक निपजू लागले तर समाजाचा, राष्ट्राचा नाश आहे. म्हणून शीलाची किंमत शिक्षणापेक्षा अधिक आहे. म्हणून विद्यार्थ्यांनो! तुमच्या ध्यानी आले असलेच की, शिक्षणापेक्षा शीलाची किंमत अधिक आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**शब्दार्थ व टीपा :**

▪ गाऱ्हाणी - तक्रारी ▪ निवारणे - सोडविणे, नष्ट करणे ▪ अवसर - वेळ ▪ अवगत होणे - मिळवणे, साध्य होणे ▪ निरक्षर - अडाणी, लिहिता-वाचता न येणारा ▪ घमेंड - गर्व, ताठा ▪ दीर्घोद्योग - सतत अभ्यास अथवा काम ▪ सदाचार - चांगले वर्तन, चांगली वागणूक ▪ आत्मसिद्धी - स्वार्थ

**टीपा :** ▪ पोयवाडी - मुंबईतील एक भाग

## स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) विद्या कशाप्रमाणे आहे?

(2) आंबेडकरांनी विद्या कशी संपादन केली?

(3) माणूस विद्येचा पुजारी केव्हा होईल?

(4) दैवी शक्ती कोणती?

(5) आंबेडकरांनी 24 तासापैकी किती तास अभ्यास केला?

(6) लोकांना कोण फसविते?

**प्र.2 खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(1) आज माझ्याजवळ .............. पुस्तकं आहेत.

(2) माझं दुसरं दैवत आहे .............. .

(3) अनेक संकटांना मी तोंड दिले ते .............. जोरावर.

(4) शिक्षणापेक्षा ............... अधिक महत्वाचे आहे.

(5) शिकले सवरलेले लोक ............. शिवाय निपजू लागले तर राष्ट्राचा नाश आहे.

**प्र.3 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.**

(1) वसईचा वेढा : बखर वाड्मय : : विद्यार्थ्यांनो जागृत व्हा : ...............

(2) विद्यार्थ्यांनो जागृत व्हा : शिक्षणप्रेम : : वसईचा वेढा : ...............

**प्र.4 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) विद्या महासागरासारखी आहे म्हणजे काय?

(2) दुसऱ्या दैवताबद्दल आंबेडकरांनी काय म्हटले आहे?

(3) दीर्घोद्योग व कष्ट करण्याने यश प्राप्त होते म्हणजे काय?

(4) आत्मविश्वासाने आंबेडकरांनी काय मिळविले?

**प्र.5 खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यांत लिहा.**

(1) विद्येसाठी आंबेडकरांनी कोण कोणते कष्ट घेतले?

(2) आंबेडकरांचे ध्येय कोणते होते?

(3) अनेक संकटांना आंबेडकरांनी कशाच्या जोरावर तोंड दिले?

(4) 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्र.6 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''अपार वेदना व त्रास सोसून मी विद्या संपादन केली.''

(2) ''ज्या अभ्यासक्रमाला 8 वर्षे लागतात, तो मी 2 वर्षे 3 महिन्यात पूर्ण केला.''

(3) ''प्रत्येक इसमात प्रथम शील असावे.''

(4) ''दीर्घोद्योग व कष्ट करण्यानेच यश प्राप्त होते.''

**प्र.7 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.**

(1) विद्येबद्दल आंबेडकर काय म्हणतात?

(2) विद्या, विनय, आत्मविश्वास व शील यांना आंबेडकरांच्या जीवनात कोणते स्थान आहे?

**भाषाभ्यास :**

(1) संधी सोडवा - सदाचार, निरक्षर.

(2) सामासिक शब्दांचा विग्रह करून प्रकार ओळखा - महासागर, दीर्घोद्योग, निरक्षर, यशसिद्धी, आत्मसिद्धी, साधनसामुग्री

(3) अलंकार ओळखा -

(1) विद्या ही महासागरासारखी आहे.

(2) विद्या हे शस्त्र आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :**

- शिक्षणासाठी लालबहादूर शास्त्री, अब्दुल कलाम यांनी कोणकोणते कष्ट घेतले त्याची माहिती मिळवा.
- धनंजय कीर यांनी लिहिलेले डॉ. आंबेडकरांचे चरित्र वाचा.

**शुद्धलेखन :**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| मृत्युंजय | दृष्टिक्षेप | धृपद |
| तृतीय | ऊहापोह | आशीर्वाद |

******

# पाठ–4 : नोकर ? छे, मालक!

चिं.वि. जोशी

P8S2N8

**परिचय :**

चिंतामण विनायक जोशी (1892-1963) हे सुप्रसिद्ध मराठी विनोदी लेखक. पुणे येथे त्यांचा जन्म झाला, पालीभाषेचा विशेष व्यासंग. आरंभी शिक्षण खात्यात माध्यमिक शिक्षक, पुढे नोकरीच्या निमित्ताने बडोदा येथे वास्तव्य. पाली, इंग्रजी आणि मराठी विषयाचे अध्यापन. 1928 नंतर बडोदा सरकारचे दप्तरदार. 'सहविचार' या नियतकालिकाचे संपादक. 'एरंडाचे गुऱ्हाळ', 'चिमणरावांचे चऱ्हाट', 'पुन्हा एकदा चिमणराव', 'ओसाडवाडीचे देव', 'वायफळाचा मळा' इत्यादि विनोदी कथासंग्रह प्रसिद्ध. चिमणराव आणि गुंडयाभाऊ हे दोन मानसपुत्र त्यांनी आपल्या साहित्यातून लोकप्रिय केले.

माणसांच्या स्वभावाचे एकेक इरसाल नमुने समाजात आपल्याला पहायला मिळतात. असाच एक नमुना या विनोदी कथेत पहायला मिळतो.

ही कथा 'आणखी चिमणराव' या पुस्तकातून घेतली आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

### (मूल्य – स्वभावदोष, विनोद निर्मिती)

माझ्या सौ.ची तब्येत अचानक बिघडल्यामुळे आम्ही स्वयंपाक करण्यास एका वयस्कर बाईची निवड केली. ती बाई ठरविलेल्या दिवशी सकाळी आठच्या सुमारास बैलाच्या छकडयातून आमच्या दाराशी आली. छकडयात दोन ट्रंका आणि सतरंजीत बांधलेली छानदारशी वळकटी बैठकीवर बांधलेली होती. पुढल्या ट्रंकेवर लाकडी चौकटीत बसविलेला पाण्याचा खुजा आणि मधल्या वळकटीवर बाजाची पेटी आणि मागल्या ट्रंकेवर आजीबाई विराजमान झाल्या होत्या. त्यांनी पोपटाचा पितळी पिंजरा, घट्ट धरुन ठेवला होता आणि डाव्या बगलेत आवळून धरलेल्या बोक्याचे डोके त्या डाव्या हाताने कुरवाळीत होत्या. आमच्या दारात छकडा थांबला.



छकडेवाल्याच्या मदतीने मी सामान घरात आणून ठेविले. पोपट पाहून मुलांना आनंद झाला आणि ती त्याच्या पिंजऱ्याभोवती खेळू लागली. बोका एका कोपऱ्यात बसून निद्रासुख अनुभवू लागला. आजीबाईंनी नळाशी हातपाय धुतले व जेवण घरात फतकल मारुन हुशहुश करीत त्या बसल्या. मुले ''आजीबाई आल्या'',

असे ओरडू लागली. त्यांना रागावून त्या म्हणाल्या, ''काय बाई, चावट पोरं आहेत ही? मी काय म्हातारी-बितारी आहे, आजीबाई म्हणून घ्यायला? मला काकू म्हणत जा पण जर का आजीबाई म्हटलतं तर जळता निखारा लावीन जिभेला''.

काही वेळ हाश-हुश झाल्यावर त्या सौ.ला म्हणाल्या, ''काऊताई, तुमच्या इथं शेवा करायला मी आल्ये आहे खरी; पण माझा थकवा जाईपर्यंत माझीच प्रेमशेवा तुम्ही केलीत तर बरं होईल. थोडा पेशल टी मला

ह्या पहिल्या सलामीने मी सर्द होऊन गेलो. माझ्याच्याने राहवेना, म्हणालो ''अहो काकूबाई, ही आजारी आहे म्हणून तुम्हाला बोलावलं अन् तुम्हीच उलट तिला काम सांगता? ते चहासाखरेचं सामान आहे. तुम्ही आपल्या हातांनी करुन घ्या.''

मैनाने आईच्या सांगण्यावरुन काकूबाईस चहा करुन दिला. तो ढोसून त्या म्हणाल्या, ''मी पाच मिनिटं रामेश्वरला जाऊन येते. मैनाबाई, दोन लाकडं पेटवून भाताचं आधण ठेवा. पुढलं काम करायला मी हजर आहेच''.

नऊ वाजले तरी काकूबाईंचे रामेश्वर दर्शन संपले नाही. बिचाऱ्या मैनाने तांदूळ वैरले, सौ. ने भाजी चिरली, मोरूने ताक केले. मी ही आंघोळ केली, राघू तर बिचारा लहानच. पण सर्वांनी आपाप-ले परी मेहनतीला सुरुवात केली. तेव्हा कोठे काकूबाई धापा टाकीत आल्या. दहा वाजता आमची जेवणे कशीबशी उरकली. काही कच्चे तर काही करपलेले, काही जहाल तिखट कर काही साफ अळणी अन्न खाऊन आम्ही उठलो. दुपारी वामकुक्षीनंतर काकू पुन्हा बाहेर गेल्या.

संध्याकाळी सात वाजेपर्यंत बाईंचा पत्ता नव्हता. काकूंची वाट पाहून कंटाळलेल्या सौ. ने कण्हत कण्हत पाकसिद्धी केली. आमची जेवणे झाली. इतक्यात काकू आल्या आणि पेटी घेऊन भजन म्हणू लागल्या.

आम्ही पाकगृहाच्या दाराशी उभे राहून पाहू लागलो. काकूंनी आपला बिछाना पसरला होता. समोर पेटी घेऊन त्या ती वाजविण्यात आणि गायनात गर्क होऊन गेल्या होत्या. त्यांच्या खांद्यावर त्यांचा आवडता पोपट विराजमान झालेला होता आणि बोकोबा मालकीणीला खेटून पहुडले होते. आम्हाला पाहून पेटी थांबवून त्या म्हणाल्या, ''अप्पा, रोज रात्री घटकाभर भजन करण्याची माझी चाल आहे. तुम्हाला त्रास होत असेल तर मी आपलं मनातल्या मनात करीन''.

''भजन आणि भोजन एवढचं तुम्हाला करता येत वाटतं? मैना चवताळून म्हणाली.

भजन संपल्यावर काकूंची नाट्यगीत सुरु झाली. नाटकांच्या पदांचे आवर्तन संपता संपता रात्रीचे बारा वाजले. सकाळी सहा वाजता उठून मी पाहतो तो काकू दार सताड उघडून बाहेर गेलेल्या होत्या आणि बाहेरच्या ओसरीवर वाळत घातलेली आमची चिरगुटें नाहिशी झालेली दिसत होती. मग मी चहा केला. मैनाने पाणी तापवलं. आठाच्या सुमारास हातात ताम्हण-निरांजन घेतलेली काकूंची स्वारी डुलत डुलत घराकडे परत आली.

''काय काकू, पाहिलेत का किती वाजले?'' सौ. ने रागाने विचारले. ''झाले असतील सात सवासात. घडयाळाची बटकीण व्हायला मी काही मास्तर नाही तर कारकून नाही लागून गेले. आधी पोटोबा अन् मग विठोबा अशातली ही ठमाकाकू नाही बरं का! काकड आरतीला गेलतें तुळशी बागेत. तिथून परत येत आहे. ते जाऊ द्या; पण माझ्याकरिता चहा ठेवला की नाही मैनाताई?'' नि:संकोचपणे काकूंनी चौकशी केली.

''आम्ही तुम्हाला कामाला ठेवलं आहे का तुम्ही आम्हाला?'' सौभाग्यवतीने चिडून प्रश्न केला.

''अहो काऊताई, देवाधर्माला कसला तुमचा अडथळा? उलट माझ्या काकड आरतीचं अर्धपुण्य तुम्हाला लागेल. त्यातून मला तुमच्या इथ परकं असं मुळीच वाटत नाही. मग मैनाताईं कडून घोटभर चहा मागितला तर त्यात बिघडलं कुठं? मी तिला नातीसारखीच समजत्ये'' काकू म्हणाल्या आणि मैनाने दिलेला चहा घटाघट पिऊन चुलीपुढे फतकल मारुन बसल्या.

'मैनाताई, मला जरा लाकडं, घासलेट नि आगपेटी आणून द्या बरं, विस्तव घालायला,' काकूंनी आर्जविले. मैना 'मी नाही जा' म्हणून पळून गेली.

''मग आजीबाई तुम्ही हो कशाला?'' सौ. ने रागावून विचारले. 'मला कुणी आजीबाई म्हटलेले खपत नाही अस पहिल्यांदाच सांगितलं नाही का तुम्हाला? काकू म्हणाल तर मी कामावर राहीन. निरंजनबुवांच्या मठात तर मला सगळ्याजणी 'संगीत काकू' म्हणतात. ते असो मेलं, अन्न शिजवून द्यायचं तेवढं काम माझं आहे. बाकी सगळं तुम्ही केलं पाहिजे. सतरावेळा ऊठबस करताना माझी कंबर येते दुखून!'' आजीबाई.

''मग आजीबाई म्हणवून घ्यायची का लाज वाटते?'' असे विचारुन मोरुने तेथून पळ काढला.

सौ. ने काकूंना लाकडे, तांदूळ, पीठ दिले, भाजी चिरुन दिली, मीठमसाला काढून दिला आणि काकूंनी साडेदहा वाजेपर्यंत पाकसिद्धी केली. आम्ही जेवावयास बसलो. सौ. वाढू लागली. भात खाण्यात आमचे लक्ष आहे असे पाहून काकूंनी तपकिरीची डबी बाहेर काढून त्यातील चिमूटभर पूड नाकपुड्यात कोंबली. दोन पळांनी 'आक्छ्' असा आवाज काढून त्यांनी जो फवारा उडविला त्याच्या योगे भाजी, पोळ्या आणि भात या सर्व अन्नावर उदकसिंचन झाले. अर्थात वाढलेल्या अन्नाशिवाय आणखी अन्न खाण्याची आम्हाला कोणालाच इच्छा झाली नाही आणि आम्ही अर्धपोटीच उठलो.

दुपारी आम्ही बसलो होतो तेथे येऊन काकू म्हणाल्या ''उद्या एकादशी आहे, माहीत आहे ना?''

''आम्हाला कोणाला एकादशी नाही''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

''तुम्हाला नसली तरी मला आहे ना? मी सगळीकडे शोधून पाहिलं. तर दाणे, साबुदाणे आणखी खजूर आणून ठेवा म्हणजे झालं!''

''इतके जिन्नस पुरतील का?'' मी उपरोधिक स्वरात विचारले. उपरोध ध्यानात न आल्याची बतावणी करीत काकू म्हणाल्या, ''इतकं पुष्कळ झालं. लिटरभर दूध जास्ती आणायला मी गवळ्याला सांगून ठेवलचं आहे. माझी काही एकादशी नि दुप्पट खाशी अशातली गत नाही''.

काकूंचे एकादशी पुराण चालू असता ओसरीवरून मोठा गलका ऐकू आला. आमच्या वसंत कुत्र्याने काकूंच्या बोकोबावर हल्ला चढविला होता. ते पाहण्यास भोवताली मुले गोळा झाली. तो गोंगाट ऐकून एकादशीचा कार्यक्रम बाजूस ठेऊन शरीराचा तोल सांभाळीत काकूबाई ओसरीवर धावतच गेल्या वसंताच्या तावडीतून त्यांनी बोक्याची सुटका केली आणि त्याला कुरवाळीत त्या म्हणाल्या, ''विठ्या, बाळा तुझा पुनर्जन्मच झाला म्हणायला हरकत नाही. काय बाई तरी बिचाऱ्याचे हाल झाले आहेत! मेल्या कुत्र्यानं नखांनी ओरबाडून तुझं रगत काढलं आहे''!

सरतेशेवटी काकूंनी आम्हाला निर्वाणीचा संदेश दिला की आम्ही कुत्र्याला तरी घालवून दिलं पाहिजे अथवा काकूंना तरी कायमची रजा दिली पाहिजे. एकादशीच्या दिवशी आपल्याला बाकीच्या मंडळींचा स्वयंपाक करण्यास फुरसत नाही असे काकूंनी स्पष्ट सांगितले. मैना आज जरा अस्वस्थच होती. आणि सौ.चा रक्तदाब फारच वाढला होता, त्यामुळे मोरु आणि राघू ह्यांच्या मदतीने पिठलेभात करण्याचे मी ठरविले. उपास असल्याने काकूंचे सोवळे खुंटीला अडकून राहिलेले होते. त्या स्नानाला गेल्या असता राघूने माझ्या कानात सांगितले, 'काल काकूंनी लोण्याचा गोळा डब्यात घालून तो सोवळ्याच्या गाठोड्यात लपवून ठेवलेला आम्ही पाहिला', त्यावरून काकूंचे सोवळे खुंटीवरुन आम्ही काढून पाहिले, त्यात बांधून ठेवलेले आमचे बरेचसे जिन्नस काढून घेतले आणि उगाच तमाशा नको म्हणून मुकाटयाने गाठोडे तसेच परत ठेवून दिले.

आम्ही पिठलेभात खाल्ला. मेजवानीस मागे सारणारा काकूंचा उपवास संपला आणि आज बुधवार असल्याने आमच्या मुलांकरिता नाटकाचे फुकट पास आणण्याचे निमित्त करून त्या चालत्या झाल्या.

काकू जाताच मोरु व राघूने त्यांचा पिंजरा उघडला आणि मैनाने वाजविण्यास पेटी काढली. काकूंचा पोपट पिंजऱ्याच्या बाहेर येऊन मुलांनी दिलेल्या पेरुचा समाचार घेत होता. तोच बोकोबांची स्वारी एकदम प्रकट होऊन त्याने आपली एकादशी मोडली. मुले शुक्शुक् करीत काठ्या घेऊन बोक्याच्या मागे लागली. परंतु त्या प्राणांतिक आक्रोश करणाऱ्या पाखराला पकडून बोका पलीकडील घराच्या कौलारावर चढून गेला. थोड्या वेळाने परत आल्यावर शून्यपंजर पाहून काकूंनी जो आकांत मांडला त्याचे वर्णन करणे कठीण आहे. ''गेला ग बाई माझा राघू!' माझ्या सोनूला काळानं ओढून नेला. आता मी त्याला कुठे पाहू! अरे माझ्या राघवा !''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

आमच्या विघ्नसंतोषी शेजाऱ्या-पाजाऱ्यांना वाटले, आमचा द्वितीय पुत्र रघुनाथ (राघू) कैलासवासी झाला की काय? म्हणून ते आमच्या घराकडे आले, पण राघू म्हणजे पोपट गेला असे जेव्हा त्यांना कळाले तेव्हा ते परत गेले. पार्वती काकू तर स्पष्टच म्हणाल्या, ''विनाकारणच आम्हाला हेलपाटा पडला!''

तेवढ्यात काकूंची नजर सोवळ्याच्या गाठोड्याकडे गेली. ''माझं गठुडं लहान झालेलं दिसतं आहे! कोणी काही काढून तर नाही घेतलं?'' असे म्हणत त्यांनी गाठोडे काढून सोडले. ''हे काय बाई! माझ्या गाठुड्यातला लोण्याचा डबा काय झाला?'' त्या रागाने म्हणाल्या. 'आम्ही आमचा काढून घेतला' मैनाने उत्तर दिले. त्या सरशी काकू उसळून गेल्या, ''एवढसं मेलं लोणी ते काय अन् त्याच्याकरिता सोवळ्याला शिवणं ते काय? नेलं काकूंनी येवढसं लोणी म्हणून त्यांची चोरासारखी तपासणी करायला कशाला हवी?''

''पण आमच्या न कळत कशाला घेतलतं?'' राघूने मध्येच तोंड खुपसले.

''तुम्ही तरी माझं सोवळ्याचं गाठोडं माझ्या न कळत कशाला उघडून पाहिलतं? फिटंफाट झाली'' - काकू.

गुरुवारी सकाळी काकूंच्या बोक्याने दुधाच्या पातेल्यात तोंड घातले आणि मोरुने त्याच्या पाठीत क्रिकेटची यष्टी जोराने घातली. तेव्हा काकूंनी आकाशपाताळ एक करून सोडले. ते पाहून झाल्या दिवसांचा पगार देऊन आम्हीच काकूंना कायमचा रामराम ठोकला.

## शब्दार्थ व टीपा :

▪ छकडा - सामान वाहण्याचा लहानगाडा ▪ चिरगुटं - वस्त्र, चिंधी ▪ वैरणे - आधणाच्या पाण्यात तांदूळ वगैरे ओतणे ▪ सोवळे- पूजेच्या वेळी नेसावयाचे हलके रेशमीवस्त्र ▪ बटकीण- दासी ▪ अळणी - बेचव ▪ बगलेत - काखेत ▪ कण्हणे - विव्हळणे ▪ आवर्तन - पुन्हा पुन्हा म्हणणे ▪ निःसंकोचपणे - न लाजता ▪ घासलेट - रॉकेल ▪ आर्जविणे- विनविणे ▪ गलका - गोंधळ ▪ निर्वाणीचा - अखेरचा ▪ शून्य पंजर- रिकामा पिंजरा ▪ फुरसत - सवड ▪ यष्टी - क्रिकेटची स्टंप ▪ विघ्नसंतोषी - दुसऱ्यांच्या दुःखात आनंद मानणारे ▪ रामराम ठोकणे - कायमची रजा देणे.

## टीपा :

▪ तुळशीबाग - पुण्यातील एक व्यापारी पेठ

## स्वाध्याय :

### प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) लेखकाने स्वयंपाकासाठी कोणाची निवड केली?

(2) काकूबाईंना चहा कोणी करून दिला?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(3) काकू कोणाच्या दर्शनाला गेल्या होत्या?

(4) निरंजनबुवांच्या मठात काकूंना काय म्हणत होते?

(5) बोक्याने आपली एकादशी कशी मोडली?

(6) काकूंनी कोणता निर्वाणीचा संदेश दिला?

(7) लेखकाच्या कुत्र्याचे नाव काय होते?

(8) बुधवारी काकूबाई कोठे गेल्या?

(9) काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय वाटले?

(10) काकूंनी सोवळ्याच्या गाठोडयात काय लपवून ठेवले होते?

**प्र.2 खालील वाक्यात रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) आजीबाईंनी ............. पितळी पिंजरा घट्ट धरून ठेवला होता.

(2) मैनाबाई दोन लाकडं पेटवून ............. चं आधण ठेवा.

(3) भजनं संपल्यावर काकूंची ............. सुरु झाली.

(4) मोरु आणि राघू यांच्या मदतीने ............. करण्याचे मी ठरविले.

(5) आधी पोटोबा अन् ............. अशातली ही ठमाकाकू नाही बरं का.

(6) काकूंनी साडेदहापर्यंत ............. केली.

(7) विठ्याबाळा तुझा ............. झाला म्हणायला हरकत नाही.

(8) माझी काही एकादशी नि ............. अशातली गत नाही

(9) त्या ............. आक्रोश करणाऱ्या पाखराला पकडून बोका पलीकडल्या घराच्या कौलारावर चढून गेला.

(10) बोक्याने दुधाच्या पातेल्यात तोंड घातले आणि मोरुने त्याच्या पाठीत ............. जोराने घातली

**प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.**

(1) मुलांनी 'आजीबाई' म्हणून हाक मारताच काकू रागाने काय म्हणाल्या?

(2) लेखकाला व त्यांच्या कुटुंबीयांना जेवण सोडून अर्धपोटी का उठावे लागले?

(3) लेखक पाकगृहाच्या दारात उभे राहिल्यावर त्यांना कोणते दृश्य दिसले?

(4) लेखकाने काकूंना कायमचा रामराम का ठोकला?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.4 खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.**

(1) लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले?

(2) काकडआरतीहून परत आल्यावर काकूंनी लेखकाच्या पत्नीला कोणते उत्तर दिले?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''भजन आणि भोजन एवढचं तुम्हाला करता येतं वाटतं.''

(2) ''मग आजीबाई म्हणवून घ्यायची का लाज वाटते?''

(3) ''विठ्या, बाळा तुझा पुनर्जन्मच झाला म्हणायला हरकत नाही.''

(4) ''आम्ही तुम्हाला कामाला ठेवलं आहे का तुम्ही आम्हाला?''

**प्र.6 खालील प्रश्नाचे सात ते आठ वाक्यात उत्तर लिहा.**

(1) लेखकाने काकूंना कामावरुन काढून का टाकले? सविस्तर लिहा.

**भाषाभ्यास :**

(1) खालील वाक्प्रचारचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
विराजमान होणे, हेलपाटा पडणे, कैलासवासी होणे, आकांत मांडणे,
आकाशपाताळ एक करणे, रामराम ठोकणे.

(2) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन प्रकार ओळखा.
पाकसिद्धी, ज्ञानप्रकाश, उदकसिंचन, मीठमसाला, निद्रासुख, विघ्नसंतोषी, काकडआरती,
पद्यावली, शून्य पंजर, शेजारीपाजारी.

**उपक्रम :**

- द.मा. मिरासदार यांचे 'माझ्या बापाची पेंड' हे पुस्तक मिळवून वाचा.
- एखादी विनोदी कथा निवडून वर्गामध्ये 'कथाकथन' करा.

**शुद्धलेखन :**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| पीडा | शीर्षक | पीयूष |
| चीड | गीत | कीर्ती |

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# पाठ-5 : मनाचे पिंजरे

– अनंत काणेकर

N4F6I7

**परिचय :**

अनंत आत्माराम काणेकर (1905-1980) हे पुरोगामी विचारसरणीचे कवी व लेखक. 'चांदरात' व इतर कविता, विडंबने, निसर्ग वर्णनपर कविता, कोळ्यांच्या जीवनावरील गीते त्यानी लिहिली आहेत. 'चित्रा', 'आशा' इ, साप्ताहिकांचे ते संपादक होते. त्यानी शिंपले आणि मोती. 'तुटलेले तारे', 'पिकली पाने', हे लघुनिबंध संग्रह व 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे', 'आमची माती आमचे आकाश' ही प्रवास वर्णने तसेच 'जागत्या छाया', 'मोरपिसे', 'रूपेरीवाळू' हे कथा संग्रह व 'निशिकांताची नवरी' हे नाटक लिहिले आहे. यांनी 1957 च्या औरंगाबाद साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते.

आपल्याला एखादी वस्तू वा विषय साधा वाटतो, पण लेखक जेव्हा त्या वस्तूकडे अथवा विषयाकडे पाहतो तेव्हा त्याला त्यामध्ये एखादा मौलिक विचार सापडतो. तसा छत्रीसारखा साधा विषय पण त्यातून परिस्थितीच्या पिंजऱ्यात सापडून मानवाचे व्यक्तिमत्त्व कसे खुरटत चालले आहे हे सांगितले आहे, कसे ते या लघुनिबंधात पाहू. हा लघुनिबंध 'उघड्या खिडक्या' या संग्रहातून निवडला आहे.

(मूल्य - व्यक्तिमत्त्व विकास)

या पावसाळ्याच्या सुरुवातीला मी बारा रुपयांना एक छत्री विकत घेतली. हो हो, बारा रुपयांना छत्री. साध्या छत्र्यांचीही किंमत या दिवसात पन्नास साठ रुपये आहे. फार काय, जुन्या बाजारात देखील वीस पंचवीस रुपयाखाली छत्री मिळत नाही, आणि बारा रुपयांत मला छत्री मिळाली तरी कशी? याचं पुष्कळांना आश्चर्य वाटेल. इतरांची गोष्ट कशाला? जुन्या बाजारातल्या त्या दुकानदारालाही मी 'ती' छत्री निवडली तेव्हा आश्चर्य वाटले. आधी एक गोष्ट स्पष्टच सांगून टाकलेली बरी. पावसाळ्यात छत्री वापरण्याच्या मी विरुद्ध आहे. पण शेवटी छत्री घ्यायचीच असं ठरवलं. तेव्हा जुन्याबाजारात गेलो आणि अगदी कमीत कमीची छत्री मला दाखवं म्हणून त्या दुकानदाराला सांगितलं. दहा-बारा रुपये किंमतीच्या दोन-चार चांगल्या छत्र्या त्यानं दाखविल्या त्यापैकी एक मी घेणार होतो, इतक्यात कोपऱ्यातल्या एका छत्रीकडे माझं लक्षं गेलं.

'त्या छत्रीची किंमत काय?' मी विचारलं. 'बारा रुपये साहेब' तो म्हणाला, 'पण ती घेऊ नका तुम्ही. संबंध पाणी अंगावर येईल बघा'.

'पण ते कोपऱ्यात जे काही आहे ती छत्री आहे ना? आणि उघडून दोन चार दिवस डोक्यावर धरता येईल ना?'

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘हो’, तो म्हणाला, ‘पण साहेब’.

मी बारा रुपये त्याच्या अंगावर टाकले, आणि ती छत्री घेऊन आलो. अशा तऱ्हेने मी बारा रुपयांना छत्री घेतली, इतकचं नव्हे, तर ज्या उद्देशाने आपण पावसाळ्यात छत्र्या घेतो, तो उद्देशही अगदी संपूर्णपणे सफल झाला. जुन्या बाजारातल्या त्या दुकानदारालाही मी ‘ती’ छत्री निवडली तेंव्हा आश्चर्य वाटले. छत्री घेण्याचा उद्देश पावसाळ्यात स्वतःचा पाण्यापासून बचाव करणं हा आहे, असं पुष्कळांना वाटतं. पण ती केवळ स्वतःची फसवणूक आहे. छत्री शिवाय आपण पावसात जितके भिजतो तितकेच, किंबहुना बरेच वेळा थोडे अधिकच छत्री असताना भिजतो. त्याशिवाय ती हरवली, मोडली, उडाली, किंवा उलटी झाली म्हणजे नाना प्रकारचा मनस्ताप होतो, तो वेगळाच. छत्री घेण्यात आपला खरा उद्देश ‘का हो, भिजतसे चाललात? छत्री नाही वाटतं?’ असं कुणी विचारु नये, किंवा भिजत चाललेल्याकडे इतर लोक, ‘कोण वेडा हा!’ अशा अर्थानं टकमकं पाहतात, तसं. अर्थात ते स्वतः छत्री असूनही भिजतच असतात, - आपणाकडे कुणी पाहू नये, हाच हेतू असतो. मी जे म्हटलं की ते छत्री नावाचं बारा रूपयांचं काही तरी विकत घेऊन माझा उद्देश अगदी संपूर्णपणे सफल झाला; तो याच अर्थानं. खरं सांगायचं म्हणजे आपण स्वतःकरिता छत्री मुळीच घेत नाही. तो सर्व खटाटोप दुसऱ्यांकरिता असतो.

मला वाटतं, शेकडा नव्वद टक्के गोष्टी आपण अशाच केवळ दुसऱ्याकरिता करीत असतो. हा करतो, म्हणून तो करतो, तो करतो म्हणून तिसरा करतो आणि मग सर्वचजण ती गोष्ट करू लागतात. खरोखर आपणाला त्या गोष्टीचा काही उपयोग आहे किंवा तिच्यापासून आपणाला काही सुख आहे याचा कुणीच विचार करत नाही. म्हणजे माझं म्हणणं असं नाही की माणसानं स्वतःपुरतं पाहावं, दुसऱ्यांचा मुळी विचारच करू नये. उलट मी असं म्हणेन की दुसऱ्याला सुख होत असेल तर आपण थोडं दुःखही सहन करायला हरकत नाही. पण अनेक गोष्टी आपण करतो, की ज्या, पासून आपणाला सुखं नसतचं, पण दुसऱ्याला त्याचा काडीइतका उपयोग नसतो. जे दुःख अपरिहार्य आहे किंवा जे दुःख सहन केल्यामुळे इतरांना काही सुख होणार आहे, ते सहन करणं ठीक, पण काही एक कारण नसताना उगाच स्वतःच्या जिवाचा कोंडमारा करायचा म्हणजे काय? एकामागून एक खड्डयात उडया टाकणाऱ्या मेंढ्या आणि माणसं यांच्यात फरक तो काय राहिला मग?

परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ती होत नाही म्हणतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय हरएक तऱ्हेच्या पिंजऱ्यात मानवी व्यक्तित्व खुरटत चाललं आहे, आणि हे पिंजरे ताबडतोब तोडून फोडून टाकले पाहिजेत याच शंकाच नाही, पण एका इंग्रजी म्हणीत म्हटल्याप्रमाणं दानधर्माची सुरुवात ज्याप्रमाणं स्वतःच्या घरापासूनच व्हावी, त्याप्रमाणं या जागतिक क्रांतीचाही प्रारंभ मनाचे पिंजरे तोडून टाकण्यापासून व्हावा हे उत्तम. मोठमोठी माणसं मोठमोठया क्रांती करताहेत तोपर्यंत आपल्यासारख्या

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

छोट्या माणसांनी 'छत्री, छप्पर मुर्दाबाद!' इथंपासूनच सुरुवात करायला काय हरकत आहे? आणि ते किती सोपं आहे पाहा, हिशेबच करून दाखवितो. पावसाळा अदमासे चार महिने म्हणजे एकशेवीस दिवस असतो. पैकी फार तर साठ दिवस पाऊस पडतो. म्हणजे उरले साठ दिवस त्यातून तीस दिवस तरी रात्रीचा पडतो. राहिले तीस दिवस. तोही काही सारखा पडत नाही. आपण घरातल्या घरात किंवा कामाच्या ठिकाणी असता निदान पंधरा तरी दिवस तरी पावसाचे जातात. म्हणजे फक्त पंधराच उरले, थोडा झिम झिम पाऊस असला तर जातायेता कुठंतरी झाडाखाली किंवा एखाद्या कोपऱ्यात पाच मिनिटं थांबून आपण सहज न भिजता घरी येऊ शकतो, असे सात दिवस तरी जातात. आता आठच दिवस राहिले. आपण जायला-यायला आणि जोराचा पाऊस पडायला, असा योगायोग फार तर चार वेळा येतो. चार महिन्यातून केवळ चार वेळा छत्रीचा आपणाला उपयोग होतो, आणि इतक्या जोराच्या पावसात आपण छत्री असूनही भिजतोच. आणि तरीही आपण वाटेल ती किंमत देऊन छत्री विकत घ्यायची यातायात काय करतो, ती हरवल्यावर सुस्कारे काय सोडतो, ती उडाल्यावर तिच्यामागून चिखलपाण्यातून वेड्यासारखे धावतो काय, आणि ती उलटी झाल्यावर भररस्त्यात वेड्या-वाकड्या उडया काय मारतो! छे! छे! पुढल्या वर्षापासून "छत्री मुर्दाबाद!".

### शब्दार्थ व टीपा :

▪ मनस्ताप - मनाला होणाऱ्या यातना/दुःख ▪ कोंडमारा होणे - उघडपणे न सांगता येणे ▪ अपरिहार्य - नाईलाज ▪ हरएक - प्रत्येक ▪ यातायात - त्रास ▪ खुरटणे - वाढ खुंटणे ▪ क्रांती - अचानक होणारा बदल ▪ सुस्कारा - उसासा

### टीपा :

▪ **लघुनिबंध :-** साध्या साध्या विषयातून लेखकाने वाचकांशी मारलेल्या गप्पा!. लघुनिबंधाला कोणाताही विषय वर्ज्य नसतो. लेखकाच्या अंतरंगात उठलेले विचारांचे तरंग व त्यापासून वाचकांना मिळणारा आनंद असे लघुनिबंधाचे स्वरूप. याचे जनक ना.सी. फडके होय. ते लघुनिबंधाला 'गुजगोष्ट' म्हणत.

### स्वाध्याय :

### प्र.1 पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) लेखकाने पावसाळ्याच्या सुरूवातीला किती रुपयाला छत्री विकत घेतली?
(2) लेखक कोणत्या गोष्टीच्या विरुद्ध आहे?
(3) मानवाच्या मुक्तीसाठी काय केले पाहिजे?
(4) दान-धर्माची सुरुवात कोठून व्हावी?
(5) पुढच्या वर्षापासून लेखक कोणते आंदोलन करणार आहेत?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) लेखकाने पावसाळ्याच्या .............. छत्री विकत घेतली.

(2) लेखकाने .............. मधून छत्री विकत घेतली.

(3) शेकडा .............. गोष्टीं आपण दुसऱ्याकरिता करीत असतो.

(4) ............... चे पिंजरे तोडून टाकल्या शिवाय मानवाची मुक्ती होत नाही.

(5) पावसाळा अदमासे.............. दिवस असतो.

**प्र.3 पुढील प्रश्नांची उत्तरे तीन-चार ओळीत लिहा.**

(1) दुकानदाराला आश्चर्य का वाटले?

(2) 'कोपऱ्यातील छत्री घेवू नका' असे दुकानदार लेखकांना का म्हणाला?

(3) 'छत्री आपण दुसऱ्यासाठी घेतो' असे लेखक का म्हणतो?

(4) मनाचे पिंजरे कोण कोणते आहेत?

**प्र.4 खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा.**

(1) पावसाळ्याचा हिशेब लेखकाने कसा घातला आहे?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''पण ती घेऊ नका तुम्ही, संबंध पाणी अंगावर येईल बघा!''

(2) ''पण ते कोपऱ्यात जे काही आहे ती छत्री आहे ना?''

**प्र.6 पुढील प्रश्नाचे उत्तर. सात ते आठ वाक्यात लिहा.**

(1) या लघुनिबंधातून मानवी मनाच्या कोणत्या प्रवृत्ती दाखविल्या आहेत?

**भाषाभ्यास :**

(1) विरुद्धार्थी शब्द लिहा.

सफल, खुरटणे, दुःख

**उपक्रम :**

- ना.सी. फडके यांच्या कुमारमित्रहो । पुस्तकातील लघुनिबंध मिळवून वाचा.
- म.ना. अदवंत यांचा 'निसर्ग आणि आम्ही' हा लघुनिबंध मिळवून वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ-6 : जपानी स्त्री

इंदू साक्रीकर

T2Q3V7

**परिचय :**

इंदू दिनकर साक्रीकर (1923-1963) या सामाजिक कार्यकर्त्या आणि कथालेखिका. त्यांचे 'निळाई', 'अपूर्ती', 'मोहर' हे कथासंग्रह आहेत. 'सापशिडी' हा एकांकिका संग्रह. 'पूर्वेच्या परिसरात' हे प्रवास वर्णन आहे. सामाजिक भान ठेवून भोवतालच्या जीवनाचे रेखीव अन सुबोध शैलीत चित्रण करणे ही इंदू साक्रीकर याच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

पारंपरिक बुजरेपणा बाजूस ठेवून आधुनिक काळात स्त्रीने सर्वक्षेत्रात धीटपणे वावरले पाहिजे असे इंदू साक्रीकर यांना वाटते. जपानमधील महायुद्धोत्तर काळातील स्त्रीमध्ये हे परिवर्तन त्यांना तीव्रतेने जाणवले.

सामाजिकचित्रण हा या प्रवासवर्णनपर लेखनाचा एक घटक येथे ठळकपणे प्रकट झाला आहे. हा पाठ 'पूर्वेच्या परिसरात' या प्रवासवर्णनातून निवडला आहे.

(मूल्य - कुतूहल)



जपानी स्त्री गोड, लाघवी, शालीन, हसरी. भाषेत बोलता नाही आलं, तरी ती हसऱ्या डोळयांनी तुमचं स्वागत करील. कुठल्याही हॉटेलात जा, पाहुण्यांची यथास्थित सरबराई करण्यात हॉटेलच्या मालकिणी अगदी गढलेल्या असतात. जणू सरबराई करणं एवढचं त्यांचं जीवितकर्तव्य! अर्थात 'टीपसाठी त्या हे सर्व करीत नाहीत. कारण जपानमध्ये 'टीप घेणे' हे कमीपणाचे समजतात. हिंदुस्थानात खास माजघरात किंवा स्वयंपाकघरात दडलेला हा शालीनपणा सामाजिक करण्याचा प्रयत्न करणारं जपान हे पृथ्वीतलावरचं एकमेव राष्ट्र असेल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इतरही बहुतेक सर्व क्षेत्रात जपानी स्त्रीचं सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनही फार पुढारलेले आहे. बाहेरचा सर्व कारभार जवळजवळ तिच्याच हातात आहे. ट्रॅम कंडक्टर, बस कंडक्टर, दुकानातील विक्रेत्या, हॉटेलमधील वाढपी, लिफ्टमन वगैरे कित्येक क्षेत्रे जणू खास स्त्रियांचीच राखीव अशी आहेत. बूटपॉलीश आणि केस कापण्याच्या धंद्यातसुद्धा बऱ्याच स्त्रिया आहेत.

18 पासून 30 वर्षांच्या बहुतेक अविवाहित मुली वर सांगितलेल्या धंद्यात काम करीत असतात. स्वतःच्या लग्नासाठी पैसा जमा करायला त्यांना लाज वाटत नाही. उलट जीवनमान वाढविण्यासाठी ह्या सर्व गोष्टी आपल्याला केल्याच पाहिजेत अशी त्यांची श्रद्धा आहे. कपडे धुवायचे यंत्र, टेलिव्हिजन, टेलिफोन घरात असलाच पाहिजे असा त्यांचा हट्ट आहे. त्यासाठी त्या लग्नाच्या अगोदर पैशाची तरतूद करून ठेवीत असतात.

एकदा मी जपानच्या परिषदेकरिता गेले होते. त्यावेळी दर चारआठ दिवसांनी आम्हा प्रतिनिधींना आसपासच्या निरनिराळ्या गावांत नेण्यात येई. तेव्हा पुष्कळदा आगगाडीतून मी प्रवास केला. गाडीच्या डब्यातल्या कँटिनमध्येही 18 ते 19 वर्षांच्या मुली काम करीत होत्या. हॉटेल चालवणं, कप विसळणं, डब्यात जेवणाचे कागदी डबे विकणं, वगैरे हलकी समजली जाणारी कामं! तसेच रात्रीच्या गाड्यांतून सुद्धा अतिशय निर्भयपणानं ही सारी कामं करणाऱ्या ह्या तरूण मुली पाहून मला रात्रीचा प्रवास सोबतीशिवाय न करणाऱ्या सुशिक्षित हिंदी मध्यमवयीन स्त्रियांची आठवण झाली. पार्लमेंट मध्ये तीनवेळा निवडून आलेल्या मिसेस कमीजखाँ, ह्या सोशॅलिस्ट पक्षाच्या एका प्रभावी कार्यकर्तीची मी मुलाखत घेतली. मी माझा प्रश्न त्याना विचारला ''ह्या तरुण मुलींना असं एकटं रहायची भीती नाही वाटत?

''तुमचा प्रश्नच मला समजत नाही!''
''माझं म्हणणं, रात्री एकटं राहायची भीती!''

आमच्या देशात अशी भीती आता अस्तित्वात राहिली नाही, रस्त्यात उगीचच घोटाळत उभं राहून मुलींची चेष्टा करणं... किंवा त्यांना काही त्रास देणं हे निरूद्योगी प्रकार जपानमध्ये तुम्हाला कुठेच आढळणार नाहीत. उलट मुली नोकरी न करता घरात बसू लागल्या तरच त्यांची चेष्टा होईल.

त्यांच्या ह्या उत्तरानं मी मनातल्या मनात सर्दच झाले. पुढं काय बोलावं हे मला सुचेना. एके काळी हिंदी स्त्रियांपेक्षा अगदी मागे, गोषात वावरणाऱ्या ह्या जपानी स्त्रिया इतक्या कशा पुढारल्या? ह्या कोडयाचा मी मनाशीच विचार करीत राहिले. तेव्हा कमीजखाँ हसत हसत म्हणाल्या ''फार आश्चर्य वाटलं असेल नाही तुम्हाला! पण तुम्हाला माहीत आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वी आमची काय स्थिती होती ते! आम्ही अगदी अंधारात होतो असे म्हटले तरी चालेल. आमची ही पडकी अंधारी घरं दोन धक्क्यात पार उखडून पडली. एक म्हणजे 1819 साली झालेला भूकंप आणि दुसरा हिरोशिमावर

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1945 साली झालेला बाँब हल्ला! ही दोन महाभयानक संकटं आमच्या प्रगतीला सर्वस्वी कारणीभूत आहेत. घराचा आधारच नाहीसा झाल्यावर आम्हाला रस्त्यावर यावच लागलं. व स्वतःच्या पायांवर उभे राहण्याखेरीज गत्यंतर राहिलं नाही.

कमीज खाँच्या प्रयत्नामुळे दुसऱ्या दिवशी मी त्यांच्या बरोबर स्त्रियांच्या एका क्लबच्या पार्टीला गेले. टोकिओमधल्या एका फॅशनेबल हॉटेलमध्ये ही पार्टी होती. काही प्रतिष्ठित पुरुषमंडळीही ह्या समारंभाला हजर होती. मध्यभागी पिंगपाँगसारखं खूप मोठं, लांबट, टेबल होत. दोन्ही कोपऱ्यात झगझगीत प्रकाशात मोठमोठे कॅमेरे स्टँडवर उभे केले होते. टेबलावर सर्व खाद्य पदार्थ व पेये कलापूर्ण पद्धतीने मांडली होती. मध्यभागी लाऊडस्पीकरही होता. हजर असलेल्यात राजकन्या, प्रसिद्ध नटी, गायिका, कवयित्री, कादंबरीकार, लघुकथालेखिका अशा स्त्रिया होत्या. मला त्यांची तोंडओळख व्हावी म्हणून कमीजखाँनी मला बोलावलं होतं. त्या राजकन्या इतक्या नम्र होत्या की राजकन्येचा दिमाख त्यांच्या वागण्या बोलण्यात अजिबात दिसत नव्हता.... टोकिओमधील माझ्या मुक्कामात मी बघता येईल. तेवढ्या स्त्रियांच्या संघटना पाहून घेतल्या. या संघटना टोकिओपासून खूप लांब अंतरावर होत्या.

त्यापैकी सर्वात महत्त्वाच्या संघटना म्हणजे 'मदर्स युनियन' आणि 'हाऊस वाइव्हज युनियन'. प्रथम मी 'मदर्स युनियन'च्या अध्यक्षांना भेटायला गेले. एका मोठ्या तीन मजली इमारतीत आम्ही शिरलो. पहिल्या मजल्यावर मदर्स युनियनचं ऑफिस होतं. दुसऱ्या मजल्यावर पालकांची संस्था आणि तिसऱ्या मजल्यावर शिक्षकांच्या संघटनेचं ऑफिस. मदर्स युनियनच्या अध्यक्षा 70-75 वर्षाच्या होत्या. पण त्यांचा उत्साह मात्र दांडगा होता. मला त्यांच्या चेहऱ्यावर अलौकिक तृप्ती जाणवली. नावावरून वाटलं ही संस्था केवळ मातांची मार्गदर्शक असेल. तशी ती आहेच. आणि 1945 साली हिरोशिमावर बाँब हल्ला झाला तेव्हा अनेक घर जमीनदोस्त झाली. कित्येक संसार धुळीला मिळाले. देशातील तरुण पुरुषांची संख्या कमी झाली. आईबापाविना, घरादाराविना पोरकी झालेली दीनवाणी मुलं दारोदार हिंडू लागली. त्या मुलांना आश्रय देण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना झाली.

दुसरी संस्था 'हाऊस वाइव्हज' (गृहिणीमंडळ), या संस्थेची स्थापना 1948 साली झाली. या संस्थेचे काम पाहून मी भारावून गेले आणि आम्ही खूप मागे आहोत हे जाणवले; खंतही वाटली. या गृहिणी मंडळाची खूण म्हणजे लाकडाचा मोठा हात! मातीमोल होत चाललेल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी खंबीरपणे पुढे आलेला हात! त्यासाठी प्रथम या गृहिणींनी वर्गणी जमवून देणग्या मिळवून स्वतःची सहा मजली इमारत बांधली आहे. या इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर एकेक विषयाचा वर्ग चालतो पुष्परचना, हस्तव्यवसाय, आहारशास्त्र, गृहरचना, स्वयंपाक हयांचे वर्ग इथे चालतात. तसेच आपलं जीवनमान कसं सुधारता येईल. बाजारहाट कसा करावा, नकली वस्तूपासून सावध कसे रहावे, आपल्याला मिळणाऱ्या पैशात बजेट कसे तयार करावं, याच तज्ज्ञांकडून ज्ञान दिलं जातं, येथील पाचव्या मजल्यावर

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

एक प्रयोगशाळा आहे. तेथे वस्तुंमधील भेसळ उपकरणांच्या सहाय्याने तपासली जाते. त्यासाठी त्याचं एक स्टँडर्ड ठरवलं जातं व ज्या वस्तुत भेसळ सापडेल व जिचा भाव मंडळाने ठरविल्यापेक्षा वाढलेला सापडला तर त्यावर सार्वत्रिक बहिष्कार टाकला जातो. ह्यातून जीवनोपयोगी वस्तू दूध, तूप, कापड यांचीही कसून पाहणी केली जाते आणि हा बहिष्कार इतका जबरदस्त असतो की या लाकडी हातासमोर सरकार चळाचळा कापू लागतं, त्यामुळे जपानी दुकानात सचोटीच आढळते. या संस्थेच्या 207 शाखा देशभर पसरल्या आहेत. या संस्थेने सरकारवर एवढी मोठी सत्ता गाजवली आहे. असे काम दुसऱ्या कुठल्याही देशातल्या स्त्रिया करत असतील असं वाटत नाही.

अशा सोज्ज्वळ, शालीन, निर्भय जपानी बाईचा, स्त्री म्हणून अभिमान वाटला!

## शब्दार्थ व टीपा :

▪ लाघवी - प्रेमळ ▪ शालीन - नम्र ▪ सरबराई करणे - आदरातिथ्य करणे ▪ निर्भय - धीट ▪ निरुद्योगी - काम नसलेले ▪ सर्द होणे - सुन्न होणे ▪ अलौकिक - तेजस्वी ▪ तृप्ती - समाधान ▪ जमीन दोस्त होणे - संपूर्ण नाश होणे

## टीपा :

▪ पिंग पाँग :- पिंगपाँग इ.स. 1800 मध्ये युरोपात छोटा चेंडू आणि गोल लाकडी बॅट घेऊन डायनिंग टेबलावर हा खेळ खेळला जाई. नंतर सेल्युलाईडचा बॉल वापरून व बॅटवर रबराचे कव्हर घेऊन खेळू लागले. 1926 मध्ये राष्ट्रीय टेबलटेनिस असोसिएशनची स्थापना झाली. 1950 ते 60 या काळात जपानमध्ये 1960-1970 मध्ये चीनमध्येही हा खेळ खेळला जाऊ लागला. 1980 पासून याचा समावेश ऑलिंपिक मध्ये करण्यात येऊन तो खेळ जगप्रसिद्ध झाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### स्वाध्याय

### प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) जपानी स्त्री कशी आहे?

(2) जपानी स्त्री कोणकोणत्या क्षेत्रात पुढारलेली आहे?

(3) जपानी स्त्रियांची कोणती श्रद्धा आहे?

(4) जपानी स्त्रियांचा कोणता हट्ट असतो?

(5) लेखिकेने कमीजखाँना कोणता प्रश्न विचारला?

(6) जपानी तरुण मुलींची चेष्टा केव्हा होते?

(7) जपानमधील सर्वात महत्त्वाची संस्था कोणती आहे?

(8) 'हाऊस वाइव्हज' या संस्थेची स्थापना केव्हा झाली?

(9) घराचा आधार नष्ट झाल्यावर जपानी लोकांना काय करावं लागलं?

(10) अविवाहित जपानी तरुणींचा कोणता हट्ट असतो?

**प्र.2 खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) हिंदुस्थानात स्वयंपाक घरातील .............. सामाजिक करणार जपान हे एकमेव राष्ट्र.

(2) जपानमध्ये .............. कमीपणाचे समजतात.

(3) जपानी अविवाहित मुली .............. अगोदर पैशाची तरतूद करून ठेवतात.

(4) कमीजखाँ ह्या ............... पक्षाच्या कार्यकर्त्या होत्या.

(5) आम्ही अगदी .............. होतो असं म्हटलं तरी चालेल.

(6) टोकियोमधील एका .............. हॉटेलमध्ये पार्टी होती.

(7) राजकन्येचा दिमाख त्यांच्या .............. अजिबात दिसत नव्हता.

(8) गृहिणी मंडळाची खूण म्हणजे .............. .

(9) जपानी दुकानात .............. आढळते.

(10) 'हाऊस वाइव्हज' या संस्थेच्या जपानभर .............. शाखा आहेत.

NOT TO BE REPUBLISHED
© KTBS

**प्र.3 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.**

(1) मनाचे पिंजरे : उघड्या खिडक्या : : जपानी स्त्री : ...............

(2) 1819 : जपानमध्ये भूकंप : : 1945 : ...............

(3) अनाथ मुलांना मदत : मदर्स युनियन : : गृहिणींना मदत : ...............

**प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.**

(1) जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात?

(2) जपानमध्ये कोणते निरुद्योगी प्रकार आढळत नाहीत?

(3) रात्रीच्या वेळीसुद्धा जपानी स्त्रिया कोणकोणती कामे करतात?

(4) जपानच्या प्रगतीला कोणत्या दोन गोष्टी कारणीभूत होत्या?

(5) क्लबच्या पार्टीत कोणकोण स्त्रिया आल्या होत्या?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''आमच्या देशात अशी भीती आता अस्तित्वात राहिली नाही.''

(2) ''आम्ही अगदी अंधारात होतो.''

(3) ''राजकन्येचा दिमाख त्यांच्या वागण्याबोलण्यात दिसत नव्हता.''

(4) ''बहिष्कार इतका जबरदस्त असतो की सरकार चळाचळा कापतं.''

**प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.**

(1) कमीज खाँच्या समवेत झालेल्या स्त्रियांच्या क्लब पार्टीचे वर्णन करा.

(2) 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

**प्र.7 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.**

(1) 'हाऊस वाइव्हज' या संस्थेची माहिती लिहा.

(2) या पाठाच्या आधारे 'जपानी स्त्री' यावर टीप लिहा.

**भाषाभ्यास :**

(1) खालील सामसिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा

जीवितकार्य, स्वयंपाकघर, निरुद्योगी, कार्यकर्ती, कादंबरीकार, राजकन्या, पुष्परचना, आहारशास्त्र, गृहरचना, प्रयोगशाळा, जीवनोपयोगी, तोंडओळख, कलापूर्ण, निर्भय गृहिणीमंडळ, कार्यकर्ती, पुष्परचना.

(2) संयुक्तवाक्य करा.

(1) इतर बहुतेक क्षेत्रात जपानी स्त्रीचं जीवन पुढारलेले आहे.
बाहेरचा सर्व कारभार तिच्याच हातात आहे.

**उपक्रम :**

- 'चिनी माती' हे मीना प्रभू यांनी लिहिलेले चीनचे प्रवासवर्णन वाचा.
- आधुनिक कुटुंबपद्धतीतील DIO (डबल इन्कम वन् कीड) आणि DIN (डबल इन्कम नो कीड) या संकल्पनांचा अर्थ शिक्षकांकडून समजावून घ्या.

**शुद्धलेखन :'**

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| गोषवारा | अमानुष | जन्मभूमी |
| उन्नयन | सिंह | तथापि |

******

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-1: पैल तो गे काऊ कोकताहे

संत ज्ञानेश्वर

Z3W8R9

परिचय :

ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी (1275 - 1296) मराठीतील महान संतकवी व तत्वज्ञ. हे मूळचे नाथ संप्रदायी होते. वडीलबंधु निवृत्तीनाथ हे त्यांचे गुरु. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ज्ञानेश्वरी पूर्ण केली. ज्ञानेश्वरी ही भगवद्गीते वरील मराठीत केलेली टीका होय. त्यांनी आळंदी येथे वयाच्या एकविसाव्या वर्षी संजीवन समाधी घेतली. 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी' हे इतर ग्रंथ ; तसेच अभंग व पदे ही स्फुट रचना त्यानी केलेली आहे. 'ओवी ज्ञानेशाची' असा त्यांच्या 'ओवीचा' सार्थपणे गौरव केला जातो.

पुढे येणाऱ्या एखाद्या चांगल्या घटनेची सूचना काही वेळा आधीच मिळते. या सूचनेलाच शकुन म्हणतात. कावळा ओरडला की पाहुणे येतात अशी समजूत आहे. आपला आवडता पाहुणा (पांडुरंग) यावा म्हणून कावळ्याने ओरडावे यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला काय काय देऊ करतात ते या विरहिणीत पाहू. 'सकल संतगाथा' यामधून ही विरहिणी घेतली आहे.

(मूल्य-आर्तता, तळमळ)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पैल तो गे काऊ कोकताहे
शकुन गे माये सांगताहे ।। 1 ।।

उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ।
पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती ।। 2 ।।

दहीभाताची उंडी लाविन तुझ्यातोंडी।
जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगीं ।। 3 ।।

दुधे भरुनि वाटी लावीन तुझे वोंठी।
सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ।। 4 ।।

आंबया डहाळी फळे चुंबी रसाळी।
आजिचे रे काळी शकुन सांगे ।। 5 ।।

ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खुणे।
भेटती पंढरीराणे शकुन सांगे ।। 6 ।।



## शब्दार्थ व टीपा :

▪ पैल - पलिकडे ▪ काऊ - कावळा ▪ कोकताहे - ओरडत आहे ▪ शकुन - शुभसंकेत, शुभसूचक ▪ पाऊ - पाय ▪ मढवीन - सजवीन ▪ उंडी - घास, गोळा ▪ पंढरीरावो - विठ्ठल ▪ कैं - कधी ▪ पढिये - प्रिय, आवडता ▪ वोंठी - ओठाला ▪ गोठी - गोष्टी ▪ कायी - काय ▪ डहाळी - फांदी ▪ पंढरीराणे - पंढरीचा राजा (पांडुरंग).

## टीपा :

विरहिणी - देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी काव्यरचना. यामध्ये भक्त स्वतः ला प्रेयसी आणि देवाला प्रियकर समजतात.

कावळा - हा कवींनी वर्ज्य मानलेला पक्षी आहे. पण लोकसाहित्यात तो माहेरचा दूत मानला आहे. या विरहिणीतील स्त्री त्याला प्रेमाने 'काऊ' म्हणते. त्याने 'पंढरीराव' घरी येण्याचा शकुन सांगावा असे तिला वाटते.

NOT TO BE REPUBLISHED
@KTBS

### स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

(1) कवी कुणाशी बोलत आहे ?
(2) पाहुणे म्हणून घरी कोण यावे असे कवीला वाटते ?
(3) कावळ्याने कोणता शकुन सांगावा अशी कवीची इच्छा आहे ?

प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

(1) ........ ची उंडी लाविन तुझ्या तोंडी.
(2) उड उड रे काऊ तुझे ............ ने मढवीन पाऊ.
(3) ............ डहाळी फळे चुंबीरसाळी.
(4) भेटती ............ शकुन सांगे

प्र.3 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा

(1) हवा असलेला शकुन सांगण्यासाठी कवी कावळ्याला कोणकोणत्या गोष्टी देऊ करतो?

प्र.4 संदर्भासह स्पष्टीकरण करा

(1) ''जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी''
(2) ''पाहुणे पंढरीरावो घरा कैं येती''

प्र.5 खालील प्रश्नाचे सात ते आठ वाक्यात उत्तर लिहा.

(1) या संपूर्ण अभंगाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

## भाषाभ्यास

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समासाचा प्रकार ओळखा.
पंढरीराव, दहीभात, ज्ञानदेव.

(2) खालील ओळीतील अलंकार ओळखा.
''उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीन पाऊ''
''आंबया डहाळी, फळे चुंबी रसाळी''

उपक्रम

- ज्ञानदेवांचे 'पसायदान' मिळवून वाचा.
- स्वरसाम्राज्ञी लता मंगेशकरांनी गाईलेली 'मोगरा फुलला' ही ध्वनिफीत मिळवून ऐका.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| |
|---|
| मुक्त द्‌वार, भुकेला, पुरोगामी |
| तुडुंब, प्रतिगामी, गोजिरवाणा |

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# कविता-2: रुक्मिणीचे श्रीकृष्णांस पत्र

D6F9W2

– नरेंद्र

## परिचय :

नरेंद्र पंडित अयाचित - रामदेवरायाच्या दरबारी नरेंद्र, शैल्य व नृसिंह हे तीन भाऊ दरबारी कवी होते, यापैकी शैल्य याने 'रामायणावर रचना केली. तर नृसिंहाने 'नलोपाख्यान' रचले. नरेंद्राने श्रीकृष्णचरित्रावर रचना करण्याची घोषणा केली. त्याप्रमाणे 'रुक्मिणी स्वयंवर' ही 1880 ओव्यांची रचना केली. नरेंद्र पंडित अयाचित यांनी 1293 मध्ये हा ग्रंथ पूर्ण केला. या काव्यातील शब्दसौंदर्य व अर्थसौंदर्य यामुळे राजाच्या मनात असूया निर्माण झाली. त्याने द्रव्यलोभ दाखवून ते काव्य आपल्या नावावर करण्यास सांगितले. नरेंद्राने यावर दिलेले उत्तर तडफदार होते. ''राजे हो : आमुचेया कविकुळा बोलू लागेल,'' त्यावर राजाने धमकी दिली. म्हणून तीनही भावानी दुरुस्तीची सबब सांगून काव्य घरी नेले व एका रात्रीत त्याची नक्कल उतरवली. परंतु ते फक्त 900 ओव्याच नकलू शकले व ग्रंथ राजाकडे दिला. शेवटी या घटनेमुळे राजाला उपरती झाली व त्याने महानुभाव संप्रदायी नागदेवाचार्यांचा मार्ग अनुसरला. नरेंद्राच्या नावे 900 ओव्यांपैकी 879 ओव्याच राहिल्या. त्यांच्या 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथातून खालील उतारा. घेतला आहे हा ग्रंथ श्री. वा. ना. उत्पात यानी संपादित केलेला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## पार्श्वभूमी :

विदर्भ देशीच्या भीमक राजाला पाच पुत्र व एक कन्या होती. राजाला आपल्या कन्येचा म्हणजे रुक्मिणीचा विवाह श्री कृष्णाबरोबर करुन द्यायचा होता. परंतु युवराज रुक्मिणीच्या भावाला (रुक्मि) हे मान्य नव्हते. रुक्मि हा बलशाली होता. त्याने आपल्या बहिणीचा विवाह चेदीचा राजा शिशुपाल याच्याशी निश्चित केला. परंतु रुक्मिणीच्या मनात श्रीकृष्णाशी विवाह करावयाचा होता. म्हणून तिने 'सुदेव' या गुरु व ब्राह्मणाकडून श्री कृष्णाला पत्र लिहून पाठविले. त्याकाळातील हे भक्तियुक्त प्रेमपत्र आहे.



**(मूल्य – जिद्द, भक्ती)**

ऐकोनिया भवन सुंदर सद्‌गुणाते
कानी शिरु हरितो सकल श्रमाते
सौंदर्य जे बघुनी सार्थक लोचनांसी
माझे जडे नाते भवत्‌पदासी ।। 1 ।।

विद्याधिकार कुलशील सुरुपताही
साजेशी तुज जगात कुणीही नाही
जाणीव ही असुनि देव कुलीन कन्या
तूतेचि इच्छित पती म्हणुनि अनन्या ।। 2 ।।

चित्ते करुन तुज मी तव होय जाया
घे धाव सत्वर आता मज वाचवाया
घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा
कोल्हा स्वभाग पळवी ऋचते न सिंहा ।। 3 ।।

केली व्रते नियमही धरिले विशेषी
पूजियले सतत देवगुरु द्विजाशी
न लाविले कधीच विन्मुख याचकाते
ते पुण्य उद्यत करी तुज यावयाते ।। 4 ।।

आले ससैन्य मागदेश विदूरथादी
रक्षावया परिणयातूर भूप चेदी
सर्वा तयास निज बाहू पराक्रमाने
दंडूनि ने मजसी राक्षस पद्धतीने ।। 5 ।।

बंधुसवे झगडल्याविनही हराया
येईल ना मजसि या करिता उपाया
लग्नाआधी नववधू कुलदेवतेसी
वंदू वनी रिघत तेथूनि ने तियेसी ।। 6 ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इच्छा जरि न पुरली मम पद्‌मनाभ
देईन जीव सहसा हासडूनी जीभ
घेऊनी जन्मशत उग्र तपे तुझे ते
पावेन पाय शिवही नमितो जयाते ।।7।।

## शब्दार्थ व टीपा :

▪ उपरती - पश्चाताप, ▪ भवन - त्रिभुवन, स्वर्ग, मृत्यू, पाताळ, भुवन, जग ▪ भवत्‌पद - परमेश्वराचे पाय, येथे श्री कृष्णाचे पाय ▪ अनन्या - अन् + अन्या, दुसऱ्या कोणालाही नाही ▪ चित्ते - मनाने ▪ जाया-पत्नी, भार्या ▪ ऋचते - आवडे ▪ द्विज - ब्राह्मण, विप्र ▪ विन्मुख - परत पाठविणे ▪ याचक-भिक्षा मागणारा ▪ उद्यत - तयार ▪ मगदेश-मगध देशाचा राजा (जरासंध) ▪ परिणय-विवाह, लग्न ▪ भूप- राजा, नृप, नरेश ▪ चेदी - एक देश (राज्य) ▪ बाहू - हात, भुजा ▪ राक्षस - देवांचे शत्रू (विवाहाची एक पद्धत) ▪ रिघणे-शिरणे ▪ हासडून-खेचून, ओढून, हिरावून, बळजबरीने ▪ पद्‌मनाभ-विष्णू, कृष्ण.

## टीपाः

* राक्षस पद्धतीने - विवाहाच्या आठ पद्धतीपैकी एक या पध्दती (प्रकार) - (1) ब्रह्म (2) दैव (3) आर्श (4) प्रजापत्य (5) गांधर्व (6) आसूर (7) राक्षस (8) पैशाच्य यापैकी राक्षस पद्धतीमध्ये, वधूच्या आई-वडिलांच्या परवानगी शिवाय तिला पळवून नेवून विवाह करणे.

* पद्‌मनाभ - ज्याच्या नाभीतून म्हणजे बेंबीतून पद्‌म म्हणजे कमळ उगवले आहे, तो विष्णू. विष्णूचा आठवा अवतार म्हणजे कृष्ण. या कमळात ब्रह्मदेव जन्मला असे मानतात.

## सरळ अर्थ –

हे कृष्णा ! तीनही भुवनात सुंदर असे सद्‌गुण माझ्या कानावर पडले आणि माझ्या सकल श्रमाचे हरण झाले. (कष्ट संपले). जे सौंदर्य बघून डोळ्याचे सार्थक व्हावे अशा तुझ्या पायाशी माझे डोळे जडले आहेत ।। 1 ।।

सौंदर्य, कुलशील आणि विद्यावान अशी तुला साजेलशी या जगात कुणीही नाही याची जाणीव असूनही मी एक चांगल्या कुळातील कन्या तुलाच पती म्हणून स्वीकारु इच्छिते दुसऱ्या कोणालाही नाही ।। 2 ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

माझ्या मनाने मी तुझी पत्नी झाले आहे. त्यामुळे मला वाचविण्यासाठी तू ताबडतोब धाव घे. शिशुपालरुपी कोल्हा केव्हा धाड घालील हे कळेना आणि त्याने तुझ्यासारख्या सिंहाच्या मालकीच्या भागावर धाड घालून पळवून न्यावे हे तुला आवडणार नाही ।। 3 ।।

तुझे वर्णन ऐकल्यापासून तुझ्या प्राप्तीसाठी मी अनेक व्रते केली, नियम धरले, देव, गुरु आणि ब्राह्मणांची सतत पूजा केली. दारी आलेल्या कोणाही याचकास परत पाठविले नाही. या सगळ्यातून मला जे पुण्य मिळाले आहे, तेच तुला इकडे यावयास तयार करेल ।। 4 ।।

चेदीचा राजा शिशुपालाचे रक्षण करण्यासाठी मगध देशीचा राजा जरासंध आणि त्याच्याबरोबर विदुरथ वगैरे राजे स्वतःचे सैन्य घेवून आले आहेत तुझ्या बाहू पराक्रमाने त्या सर्वांना शिक्षा करुन मला राक्षस पद्धतीने पळवून ने ।। 5 ।।

माझा भाऊ रुक्मी याच्याशी भांडण केल्याशिवाय माझे हरण करण्याचा दुसरा कोणताही उपाय मला दिसत नाही. आमच्या कुळाच्या पद्धतीप्रमाणे लग्ना आधी कुलदेवतेचे दर्शन घ्यावयाचे असते, त्यासाठी मी वनात शिरणार आहे. तेथून तू मला पळवून ने ।। 6 ।।

हे पद्‌मनाभा। ही माझी इच्छा पूर्ण झाली नाही तर मी माझी जीभ हासडून जीव देईन. त्यानंतर पुढे शंभर जन्म घेवून उग्र तपश्चर्या करेन आणि प्रत्यक्ष भगवान शंकरही ज्याला वंदन करतो असे तुझे पाय मी मिळवेन. ।। 7 ।।

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## अधिक माहिती :

ही संपूर्ण कविता वसंततिलका या अक्षरगणवृत्तात आहे. या वृत्ताच्या प्रत्येक चरणात 14 अक्षरे असतात. व त-भ-ज-ज-ग-ग असे गण असतात. नरेंद्राची रचना थोडीशी शिथिल आहे. काही ठिकाणी अक्षरांच्या संख्येत फरक अढळतो. तर काही ठिकाणी गण व्यवस्थित पडत नाहीत याला वृत्तभंग म्हणतात.

### स्वाध्याय

**प्र.1 पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) नरेंद्र कोणाच्या दरबारात कवी होते ?

(2) मूळ 'रुक्मिणी स्वयंवरांतील ओव्यांची संख्या किती होती ?

(3) रुक्मिणी कोणत्या देशाची राजकन्या होती ?

(4) रुक्मिणीला किती भाऊ होते ?

(5) रुक्मिणीच्या गुरुंचे नाव काय ?

(6) रुक्मिणीने कोणाला विन्मुख पाठविले नाही ?

(7) रुक्मिणीचे लग्न कोणाशी ठरविलेले होते ?

(8) शिव कोणाचे पाय नमितो ?

**प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) सौंदर्य जे बघुनी ............. लोचनासी.

(2) तूतेची इच्छित ............. म्हणूनी अनन्या.

(3) कोल्हा ............. पळवी ऋचते न सिंहा.

(4) न लाविले कधिच ............. याचकाते.

(5) दंडूनी ने मजसी ............. पद्धतीने.

(6) देईन ............. सहसा हासडूनी जीभ.

(7) इच्छा जरि न पुरली .............

(8) घेऊनी ............. जन्म ............. तुझे ते.

**प्र.3 खालील प्रश्नांची 3/4 वाक्यांत उत्तरे लिहा.**

(1) श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले आहेत ?

(2) कृष्णाला काय आवडणार नाही ?

(3) शिशुपालाच्या रक्षणासाठी कोण कोण आले आहेत ?

**प्र.4 खालील प्रश्नांची 5 ते 6 वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे?

(2) आपण श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) '' न लाविले कधीच विन्मुख याचकाते.''

(2) ''पावेन पाय शिवही नमितो जयाते.''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र.6 खालील प्रश्नाचे उत्तर 7-8 वाक्यात लिहा.**

(1) 'रुक्मिणीचे पत्र' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

## भाषाभ्यास

(1) संधी सोडवा प्रकार लिहाः सद्गुण, विद्याधिकार, परिणयातुर, विदूरथादी

(2) विग्रह करुन समास ओळखा - सद्गुण, विद्याधिकार, अनन्या, परिणयातूर, द्विज, पद्म नाभ.

## उपक्रम

- 'रुक्मिणी स्वयंवराची' संपूर्ण कथा तुमच्या शिक्षकांकडून समजून घ्या.
- संत एकनाथांचे ''रुक्मिणी स्वयंवर'' हे पुस्तक मिळवून वाचा.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| गृहपाठ, | तृतीया, | झुळूक |
| क्षितिज, | पुटकुळी, | दृष्टिक्षेप |

*****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# कविता-3: भला जन्म हा !

शाहीर रामजोशी

Q9K7T4

परिचय :

राम जगन्नाथ जोशी (1762-1812) त्यांचे घराणे वेदशास्त्र संपन्न पंडिताचे होते. पण रामला तमाशा आवडे. वैदिक परंपरेतील रामने तमासगीर व शाहीर लोकांत वावरावे व त्यांच्यासाठी कवित्व रचना करुन द्याव्यात हे त्यांच्या परिवारालाच नव्हे तर समाजालाही रुचणारे नव्हते. पण ते तमाशातच रमले त्यांच्या रचनामध्ये संस्कृत प्रचुरता दिसून येते. त्यांनी शाहिरी वाङ्मयाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

ही लावणी आध्यात्मिक उपदेशपर आहे. यात भक्तीच्या ढोंगीपणावर कोरडे ओढले आहेत. व खऱ्या भक्तीची जाणीव करून दिली आहे. ही कविता 'नवनीत' या परशुराम गोडबोले संपादित पुस्तकातून निवडली आहे. ही लावणी त्यांनी कवी मोरोपंताना म्हणून दाखविली त्याबद्दल त्यांनी त्यांना 'कवीश्वर' ही पदवी दिली.

(मूल्य - भक्ती)

भला जन्म हा तुला लाभला खुलास हृदयी बुधा
धरि तरि हरिचा सेवक सुधा
चराचरि गुरु तरावयाला नराशिरावर हरि
जरा तरी समज धरी अंतरी
हटा तटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी
मठाची उठाठेव का करि ?

वनात अथवा जनात हो का मनात व्हावे परी
हरीचे नाव भवांबुधि तरि
काय गळ्यात घालुनि तुळशीची लाकडे
ही काय भवाला दूर करतील माकडे ?

बाहेर मिरविशि आत हरिशी वाकडे
अशा भक्तिच्या रसा रहित तू कसा म्हणविशी बुधा
हरि रस सांडुनि घेशी दुधा ।।1 ।।

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

टिळा टोपीवर शिळा पडो या बिळात करिशी जपा
तथापि न होय हरिची कृपा
दर्भ मुष्टिच्या गर्भि धरुनियां निर्भर पशुच्या वपा
जाळिशी तिळा, तांदुळा, तुपा
दंड कमंडलू बंड माजविशी मुंडमुंडशी तपा
न सार्थक लटक्या साऱ्या गपा
ही बारबार तलवार येईल काय पुन्हा ?

या दुर्लभ नर देहात ठेविशी कुण्हा
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा
वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त न द्विधा
सदा हरि कविरायावर फिदा

## शब्दार्थ व टीपा :

▪ फिदा - प्रसन्न, ▪ बुध - शहाणा ▪ सुधा - सरळ ▪ हटा तटाने - कठीण योग करुन, हट्ट करुन ▪ पट - वस्त्र ▪ जटा - केसाची गुंतागुंत ▪ शिर-मस्तक, डोके ▪ भवांबुधि तरि - संसार रुपी समुद्रातून तारुन नेणारा ▪ तुळशीची लाकडे - तुळशीच्या लाकडांच्या मण्यांपासून बनविलेली माळ ▪ टिळा - गंधाचा ठिपका ▪ टोपी - संतमंडळी घालतात तशी कान झाकणारी टोपी ▪ शिळा - दगड ▪ बिळात - गुहेत ▪ जप - मंत्राचे पठण, नामस्मरण ▪ दर्भ- होमात घालवयाचे एक प्रकारचे गवत ▪ मुष्टिच्या गर्भी - मुठीत ▪ निर्भर - निष्पाप, अजाण ▪ वपा - काळजाचा पापुद्रा, चरबी ▪ दंड - काठी ▪ कमंडलू - लाकूड, माती किंवा धातूचे पाण्याचे भांडे ▪ बंड माजविणे - प्रदर्शन करणे ▪ मुंड - हजामत, सर्व केस उतरविणे ▪ तप - खडतर आचरण, 12 वर्षाचा कालावधी ▪ लटक्या - खोटया ▪ बार बार - वारंवार, वरचेवर ▪ तलवार - युध्दात वापरावयाचे एक पोलादी हत्यार, येथे नरदेह ▪ कुण्हा - मत्सर ▪ वर्म - रहस्य ▪ चित्त - मन ▪ द्विधा - दुहेरी.

## टीपा :

▪ शाहीर - तमाशामधे गाणी लिहिणाऱ्यास शाहीर म्हणतात.

## विशेष माहिती

1. रामजोशी शाहीर असल्याने कवितेला लावणीचा बाज आहे. 'लावणी' सामान्यपणे शृंगारिक असते परंतु ही लावणी आध्यत्मिक उपदेशपर आहे. मठातील संन्याशानी धर्मप्रसार भक्ती प्रसार

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

करावा; पण अनेक संन्यासी ते सोडून नुसतेच ढोंग माजवतात या ढोंगीपणावर टीका करणारी ही लावणी आहे. राम जोशींनी एक मठाधीश सुब्रावजी बुवा म्हणून पाहिले होते त्यांचा ढोंगीपणा पाहून ही लावणी लिहिली असे मानले जाते. लावणीचे भेदिक आध्यात्मिक व बैठकीची असे प्रकार आहेत.

2. तीळ, तांदूळ, तूप - ही होमामध्ये (यज्ञात) घालावयाची द्रव्ये (वस्तू) आहेत. शक्यतो काळे तीळ वापरतात या शिवाय इतर अनेक पदार्थही वापरतात.

**स्वाध्याय :**

प्र.1 खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) भला जन्म हा कोणाला लाभला आहे ?

(2) मठाची उठाठेव कोण करत आहे ?

(3) हरिचे नाव कुठे आहे ?

(4) ढोंगी साधू बिळात काय करत आहे ?

(5) ढोंगी भक्ताचे हरिशी संबंध कसे आहेत ?

(6) 'तलवार' हा शब्द कोणास उद्देशून म्हटला आहे ?

(7) हरि कोणावर फिदा आहे ?

प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(1) चराचरी गुरु तारायाला .............. हरि.

(2) वनात अथवा जनात हो का ................ व्हावे परी.

(3) दर्भ ................ गर्भि धरुनियां निर्भर पशूच्या वपा.

(4) दंड ................ बंड माजविशी मुंड मुंडशी तपा.

(5) ही बार बार ............... येईल का पुन्हा.

(6) वर्म कळेना ............... घडेना.

(7) सदा हरि ............... फिदा.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

प्र.3 खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा.

(1) होमामध्ये काय काय जाळतात ?

(2) 'बाहेर मिरविशी आत हरिशी वाकडे' याचा अर्थ काय ?

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा.

(1) 'जरा तरी समज धरी अंतरी', असे कवी का म्हणत आहे ?
(2) 'ही बार बार तलवार येईल का पुन्हा', म्हणजे काय ?

प्र.5 खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

(1) ''हरिरस सांडून घेशी दुधा.''
(2) ''भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा.''
(3) ''ही बार बार तलवार येईल का पुन्हा ?''

प्र.6 खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय काय करतो ?
(2) 'भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा' या ओळीचा अर्थ सांगा

## भाषाभ्यास

या कवितेतील अनुप्रास अलंकाराची उदाहरणे शोधून लिहा.

## उपक्रम

- दासबोधातील मूर्खाची लक्षणे वाचा.
- 'नर जन्मामध्ये नरा करुन घे' ही राम जोशींची लावणी मिळवून अभ्यासा.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| |
|---|
| अंघोळ, कंदील, खंबीर |
| नंदादीप, मौलिक, सुज्ञ |

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# कविता–4: पाहुणे

केशवकुमार

S7X9U7

**परिचय :**

केशवकुमार (1898 - 1969) यांचे पूर्ण नाव प्रल्हाद केशव अत्रे होय. यानी वाङ्मयाच्या विविध क्षेत्रातून संचार केला आहे. ते कवी, नाटककार, दिग्दर्शक, प्राध्यापक, विनोदी लेखक, प्रभावी वक्ते, झुंझार पत्रकार, विडंबनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची 'मी उभा आहे', 'लग्नाची बेडी', 'भ्रमाचा भोपळा', 'उद्याचा संसार', 'साष्टांग नमस्कार', 'तो मी नव्हेच'....इ. नाटक गाजली. त्यांचे 'कऱ्हेचे पाणी' हे आत्मचरित्र, 'झेंडूची फुले' हा विडंबन गीतांचा काव्यसंग्रह. कथा, कादंबरी, चरित्र आत्मचरित्र अशी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. 1942 साली नाशिक येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यानी भूषविले होते.

पाहुणे खरेतर देवाचे रूप मानले जातात. पण या महागाईच्या दिवसात 'असे' पाहुणे गाठ पडले तर गृहिणीची कशी पंचाईत होते, ते या कवितेतून दाखविले आहे. हया - कवितेचा प्रकार 'विडंबन' असून ती 'झेंडूची फुले' या संग्रहातून निवडली आहे.

**(मूल्य – कोडगेपणाची चीड)**

'केशवसुत माफ करा' !

''कोठुनि हे आले येथे ? काल संध्याकाळी नव्हते !!-''
पाहुणे पसरले ओटी - वरि बघुनि आज प्रभातीं
आईला बाळ्या वदला, कुतुकानें उत्सुकलेला.

''दिसती हे कोणी आले, आपुल्याच नात्यामधले !
उघडूनि डबा ग आपुला, राजरोस करिती हल्ला !
बाबांच्या पेटीतुन गे, पळविती विडयांचे जुडगे !
मौज मला यांची वाटे, होते हे तर वद कोठें ?''

''हं हळू बोल -'' तनयाते, वर करुनी बोट वदे ते -
''कावळे, गिधाडें, घारी येती हीं जेथुनि सारीं ;
डोंगळें, डांस, घुंगुरटीं बाळा रे, जेथुनि येती ;

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

खोकला, ताप हीं दुखणीं, आपणांस येती जिथुनी ;
तेथुनीच आले येथे हे छळावया आम्हांते !''
''जातील कधीं हे आई ? घरदार न यांना कांही ?''

''नाही रे ! ते इतुक्यांत जाणार गडया नाहीत !''
'जाणार न लौकर सदनीं !' वदता गहिवरलीं जननी ;
पाहुणे मागले स्मरलें, डोंळ्यातुन पाणी आलें.

सरले जरी बारा महिनें तरि बसे देउनी ठाणें !
''देवा रे'' मग ती स्फुंदे - ''एवढा तरी जाऊं दे !''

## शब्दार्थ व टीपा :

▪ ओटी - ओट्यावर, घरालगतच्या कट्ट्यावर, ▪ पसरले - पहुडले, झोपले ▪ प्रभाती - सकाळी, पहाटेच्या वेळी ▪ वदणे - म्हणणे, बोलणे, विचारणे ▪ कुतुक - कौतुक ▪ राजरोस - डोळ्या देखत, न घाबरता ▪ हल्ला - खाऊन टाकणे, फस्त करणे, तुटून पडणे ▪ जुडगे - बिडयांचे बंडल ▪ वद - सांग ▪ तनय - मुलगा, पुत्र ▪ घुंगुरटी - चिलटें ▪ छळणे - त्रास देणे, पीडा देणे ▪ घरदार - स्वतःचा घर-संसार ▪ गडया - बाळा ▪ गहिवरणे - मन भरुन येणे, दुःखी मनाने ▪ जननी - आई, माता ▪ स्मरण - आठवण ▪ ठाण मांडणे-मुक्काम ठोकणे ▪ स्फुंदणे - रडणे.

## टीपा :

पाहुणे ही कविता 'विडंबन' या प्रकारची असून विडंबन हा 'पॅरोडी' या इंग्रजी शब्दाला पर्याय आहे. यामध्ये प्रसिद्ध अशा मूळ कवितेच्या प्रमाणे पद्य रचना केली जाते. पण उपहासात्मक विपर्यास केला जातो. आणि हसत हसत दोष दिग्दर्शन होते. प्र.के. अत्रे यांनी हा काव्यप्रकार मराठीत आणला. त्यानंतर ज.के. उपाध्ये, डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी हा प्रकार रुजविला.

'दंवाचे थेंब' ही मूळची कविता केशवसुतांची आहे. त्या कवितेत पहाटे पडणाऱ्या दंवाच्या थेंबांना बघून बाळाला वाटणारे कुतूहल व आईला वाटणारे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे. पण या विडंबनपर कवितेत पहाटेच अचानक येउन ठाण मांडणारे - पाहुणे हे चोरटे, कोडगे, आळशी आहेत. त्यांचा विनोदी पद्धतीने असा उपहास केला आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) पाहुणे केव्हा आले ?

(2) बाळयाने आईला काय विचारले ?

(3) पाहुणे कोठे पसरले आहेत ?

(4) पाहुणे कोठून आले असे आईला वाटते ?

(5) पाहुणे राजरोसपणे कशावर हल्ला करतात ?

(6) आईच्या डोळयात पाणी का आले ?

(7) शेवटचा हा पाहुणा किती दिवस ठाण मांडून बसणार आहे ?

**प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

(1) पाहुणे पसरले ओटी वरि बघुनी आज .............

(2) बाबांच्या ............. पळविती विडयांचे जुडगे.

(3) तेथुनीच आले येथें हे ............. आम्हाते.

(4) पाहुणे मागचे स्मरले ............. पाणी आले.

(5) देवा रे, मग ती स्फुंदे एवढा तरी ............. .

**प्र.3 पुढील प्रश्नांची तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(1) बाळया आपल्या आईला, कुतूहलाने काय विचारु लागतो ?

(2) पाहुण्यांचे वर्तन कसे आहे ?

(3) पाहुणे कोठून आले आहेत असे आई मुलाला सांगते ?

(4) पाहुणे केव्हा जाणार आहेत ?

(5) वर बोट करुन आई आपला बाळ्याला काय सांगते ?

(6) शेवटी आई का गहिवरते ?

**प्र.4 पुढील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरें लिहा.**

(1) पाहुण्यांना पाहून बाळ्या अचंबित का झाला ?

(2) पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(3) माणसाला येणारी दुखणी आणि पाहुणे यातील साम्य कवीनी कसे सांगितले आहे ?

(4) पाहुण्यांच्या वर्तनाने आई कंटाळून का गेली ?

**प्र.5 संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) ''दिसती हे कोणी आले, आपुल्याच नात्यामधले!''

(2) ''हं हळू बोल'' - तनयातें''.

(3) ''जातील कधी हे आई? घरदार न याना कांही ?''

(4) ''देवा रे'' मग ती स्फुंदे ! एवढा तरी जाऊं दे !''

**प्र.6 खाली दिलेल्या प्रश्नांचे सात ते आठ वाक्यात उत्तर लिहा.**

(1) या कवितेच्या आधारे पाहुण्यांच्या स्वभाव दोषांचे वर्णन करा.

**भाषाभ्यास**

(1) समानार्थी शब्द लिहा.

तनय, जननी, जुडगे, वदन, सदन, स्मरण.

**उपक्रम**

- ज. के. उपाध्ये यांची ''चाल चलाऊ भगवद् गीता'' ही विडंबनपर कविता वाचा.
- डॉ. दिलीप कुलकर्णी यांचा 'चिंचा व बोरे' हा - विडंबनपर काव्यसंग्रह वाचा.

## दंवाचे थेंब (मूळ कविता)

- केशवसुत

''कोठुनि हे आले येथे? काल संध्याकाळी नव्हते''
आईला बाळया वदला, कुतुकाने उत्सुकलेला.
''दिसती हे गोजिरवाणे, मोत्यांचे जैसे दाणे!
मौज मला भारी वाटे ! होते हे तर वद कोठे?''
''चंद्र आणि नक्षत्रें तीं, शोभलीं तेथ वा रातीं
उजेडही जेथुनि येतो, पाउसही जेथुनि पडतो.
तेथुनि हे आले येथें, तेथुनीच तूं आम्हातें!''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

राहतील येथे कां ते ? मिळतील का खेळायाते?''
''नाही रे ! ते स्वकरांत येणार गडया! नाहीत.
कौतुक कर बघुनी त्यातें, असतील ते जोवरी तेथें
सूर्य त्यास आपुल्या किरणीं, नेईल लौकर गगनीं,''
जातिल ते लौकर गगनी,'' वदतां गहिवरली जननी.
गतबाळें तिजला स्मरलीं, डोळ्यात आसवें आलीं।

''देवा रे !'' मग ती स्फुंदे, ''एवढा तरी लाभू दे!''
म्हणुनि तिनें त्या बाळाशी, धरिले दृढ निजहृदयासी!
पाहुनि त्या देखाव्याला, कळवळा कवीला आला;
वेडावुनि तयाच नादें, ''खरेंच।'' तो पुसतो खेदें -
''होते हिमबिंदु सकाळी, कोठे ते सायंकाळी ?''

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| गिरीश, | कठीण, | निर्जीव, |
| शापित, | शुचिर्भूत, | दुर्वास |

*****

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# कविता-5: गाउ त्यांना आरती

यशवंत

परिचय :

यशवंत दिनकर पेंढारकर हे (1899 - 1985) रविकिरण मंडळातील प्रमुख कवी होते. बडोदा संस्थानाचे राजकवी. महाराष्ट्र शासनातर्फे त्याना 'महाराष्ट्र - कवी' म्हणून सन्मान, स्फुट कविता, खंडकाव्य, महाकाव्य, लघुनिबंध इत्यादी स्वरुपाचे लेखन. 'यशोधन,' 'यशोगंध' हे कवितांचे संग्रह, 'बंदिशाळा', 'जय मंगला' इ. खंडकाव्ये आणि 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य प्रसिद्ध आहे. कौटुंबिक व सामाजिक भावनांचा आविष्कार, गेयता, सुबोधता आणि शाश्वत जीवन मूल्यांचा पुरस्कार ही त्यांच्या काव्य लेखनाची वैशिष्टये. यांनी आपल्या काव्य गायनाने कविता महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचविली. 1950 साली मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमलनाचे ते अध्यक्ष होते.

राष्ट्र व समाज यांच्यासाठी त्याग आणि बलिदान करणाऱ्यांचा गुणगौरव या कवितेत केला आहे. ही कविता 'यशोधन' मधून घेतली आहे या कवितेत सैनिक, देशभक्त, द्रष्टे समाजसेवक, संत यांचा गौरव केला आहे.

(मूल्य - व्यक्तिमाहात्म्य)

संगरी वीराग्रणी जे धैर्यमेरु संकटी
जन्मले या भारती
राष्ट्रचक्रोद्धारणी कर्णापरी ज्यांना मृती
गाउ त्यांना आरती
कोंदला अंधार मार्गी खाचखड्डे मातले
तस्करांनी वेढिले
संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी
गाउ त्यांना आरती
स्वार्थहेतूला दिला संक्षेप ज्यांनी जीविती
तो परार्थी पाहती
आप्त-विस्तारात ज्यांच्या देशही सामावती
गाउ त्यांना आरती

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

देश ज्यांचा देव त्यांचे दास्य ज्यांचा धर्म हो
दास्य मुक्ति ध्येय हो
आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती
गाउ त्याना आरती
देह जावो देह राहो नाहि ज्यांना तत्क्षिती
लोकसेवा दे रती
आणि सौभद्रापरी देतात जे आत्माहुती
गाउ त्याना आरती
जाहल्या दिङ्मूढ लोकां अर्पिती जे लोचने
क्षाळुनी त्यांची मने
कोटिदीपज्योतिशा ज्यांच्या कृति, ज्यांच्या स्मृती
गाउ त्याना आरती
नेटके काही घडेना काय हेतू जीवना
या विचारी मन्मना
बोधितो की एवढी होवो तरी रे सत्कृती
गा तयांची आरती

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## शब्दार्थ व टीपा :

▪ संगरी -युद्धात ▪वीराग्रणी -वीरश्रेष्ठ ▪ धैर्य मेरु -पर्वताप्रमाणे अचल, धैर्यशील ▪ राष्ट्रचक्रोद्धारणी - राष्ट्ररुपी चक्राच्या उध्दारा साठी ▪मृती - मृत्यू ▪ कोंदला - भरुन राहिला ▪ संभ्रमी - गोंधळलेल्या अवस्थेत ▪ परार्थी - इतरांसाठी ▪ रती - प्रेम ▪ दिङ्मूढ - दिशाहीन, गोंधळलेले ▪ क्षाळुनी - स्वच्छ करुन ▪ बोधितो - सांगतो ▪ तस्कर - चोर ▪ संक्षेप देणे - मुरड घालणे ▪ क्षिती - पर्वा ▪ आत्माहुती - आत्मबलिदान ▪ कोटिदीपज्योतिशा - कोटी दीप लावल्या सारखे, देदिप्यमान ▪ नेटके - चांगले.

## टीप :

▪सौभद्र - अर्जुन व सुभद्रा यांचा पुत्र अभिमन्यू. पराक्रमी, कौरव पांडव युद्धात त्याला मरण आले.
▪मार्कंडेय - त्रेता युगातील होउन गेलेले एक ऋषी. ते अल्पायुषी होते. पुढे शंकराच्या आशीर्वादाने ते दीर्घायुषी झाले, त्यानी लिहिलेले मार्कंडेय पुराण प्रसिद्ध आहे. ते शिवभक्त होते. त्यांच्यासाठी शंकराने यमाशी युध्द केले होते व ते अमर झाले होते.

## स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

(1) कोणत्या हेतूला त्यांनी संक्षेप दिला?

(2) देशभक्तांचा देव कोणता?

(3) देशभक्तांचा धर्म कोणता?

(4) समाज सेवकांचे ध्येय कोणते?

(5) लोकसेवेत मग्न असणाऱ्याना कोणती पर्वा वाटत नाही?

प्र.2 पुढील ओळीतील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

(1) राष्ट्र चक्रोद्धारणी .............. ज्याना मृती.

(2) संभ्रमी त्या जाहले .............. जे सारथी.

(3) आणि मार्कंडेयसे जे .............. काळाप्रती.

(4) जाहल्या .............. लोका अर्पिती जे लोचने.

(5) बोधितो की .............. तरी ते सत्कृती.

प्र.3 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.

(1) भला जन्म हा : लावणी : : पाहुणे : ...............

(2) लोकसेवा : षष्ठी तत्पुरुष समास : : सद्‌गुण : ...............

प्र.4 खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यात उत्तरे लिहा.

(1) कर्णा प्रमाणे बलिदान कोण देते ? का

(2) समाज सेवक कोणत्या भावनेने सेवा करतात ?

(3) परार्थीचा आप्तविस्तार कसा असतो ?

(4) मार्कंडेयाप्रमाणे काळाला कोणी जिंकले आहे ?

(5) दिङ्मूढ लोकांना कोण दिशा दाखवितात ? कसे ?

(6) कवितेच्या शेवटी कविने कोणती इच्छा व्यक्त केली आहे ?

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्र.5 खालील प्रश्नांची प्रत्येकी पाच सहा वाक्यात उत्तरे लिहा.

(1) मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्तांशी का केली आहे ?

(2) हतबुद्ध झालेल्या लोकांना समाज सेवक नवी दृष्टी कशी देतात ?

(3) समाजसेवक कोणते काम करतात?

प्र.6 संदर्भासह स्पष्टीकरण करा -

(1) ''संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी.''

(2)''आणि मार्कंडेयसे जे जिंकिती काळाप्रती.''

प्र.7 पुढील प्रश्नांची उत्तरे सात आठ वाक्यात लिहा.

(1) कवी कोणाकोणाचे गुणगान करु इच्छितो ? कां ?

(2) कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत ? ते स्पष्ट करा.

भाषाभ्यास

(1) पुढील संधीचा विग्रह करुन प्रकार ओळखा.

आत्माहुती, दिङ्मूढ, वीराग्रणी, सत्कृती, तत्क्षिती, मन्मन

(2) पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा.

लोकसेवा, आत्माहुती, धैर्यमेरु, राष्ट्रचक्र

दास्यमुक्ती. दीपज्योती

(3) पुढील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

आरती गाणे, संक्षेप देणे, काळाला जिंकणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(4) पुढील ओळीतील अलंकार ओळखा व व्याख्या लिहा.

(1) ''राष्ट्रचक्रोद्धारणी कर्णापरी ज्यांना मृती''

(2) ''संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी''

(3) ''आणि मार्कंडेयसे जे जिकिती काळाप्रती''

उपक्रम :

- साने गुरुजी यांची 'बल सागर भारत होवो' ही कविता मिळवून वाचा.
- कुसुमाग्रजांची 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता मिळवून वाचा

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| |
|---|
| अनैतिहासिक, चतुर्भुज, स्तूप<br>कोट्यवधी, गांभीर्य, कर्तृत्व |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

*****

# कविता-6: या भारतात बंधुभाव

संत तुकडोजी

परिचय :

संत तुकडोजी महाराज (1909 - 1968) यांचे खरे नाव माणिक बंडोजी ठाकूर. लहानपणीच भजन, कीर्तन, भक्ती, नीती यांचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. श्री अडकूजी महाराज हे त्यांचे गुरु होत. अभंगात कीर्तनात ते खंजिरी या वाद्याचा वापर करीत असत. त्यांचा आवाजही मधुर होता. तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भाग घेतला होता. पुढे 1942च्या 'भारत छोडो' आंदोलनात भाग घेउन तुरुंगवास पत्करला होता. 'जाति निर्मूलन', 'भूदान चळवळ', या सामाजिक कार्यातही त्यांचा सहभाग होता. त्यांनी 'ग्रामगीता,' 'अनुभवसागर', 'समाज संजीवनी', 'लहरकी बरखा' अशा मराठी व हिंदी ग्रंथरचना केल्या आहेत. त्यांचे भजन कीर्तन ऐकण्यास सर्व जाती धर्माचे लोक येत असत. त्यातूनच ते समाजप्रबोधनही करीत असत. म्हणूनच त्यांना 'राष्ट्रसंत' म्हटले जाते.

वरील कविता त्यांच्या 'समाज संजीवनी' या काव्य संग्रहातून निवडली आहे. भारतात एकता नांदावी. सर्वधर्म समभाव रहावा व अस्पृश्यता नष्ट होउन. सर्वानी गुण्यागोविंदाने रहावे अशी तळमळ त्यांनी या कवितेत व्यक्त केली आहे. या कवितेचा प्रकार 'देशभक्तिपर' हा आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



(मूल्य - देशभक्ती)

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे दे वरचि असा दे,
हे सर्वपंथ, संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसूदे ।। धृ ।।

नांदोत सुखे गरीब अमीर एक मतांनी
मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी
स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे, दे वरचि असा दे ।। 1 ।।

सकलास कळो मानवता राष्ट्रभावना
हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना
उद्योगी तरुण शीलवान येथे दिसू दे, दे वरचि असा दे ।। 2 ।।

जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातून
खलनिंदका मनीही सत्य, न्याय वसू दे, दे वरचि असा दे ।। 3 ।।

सौंदर्य रमो घराघरात स्वर्गियापरी
हो नष्ट होऊ दे विपत्ती, भीती बावरी
तुकडयास सदा या सेवेमाजी वसू दे, दे वरचि असादे ।। 4 ।।

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## शब्दार्थ व टीपा :

▪ बंधुभाव-लोकांचे एकमेकांवरील भावाप्रमाणे प्रेम असणे ▪ नित्य - नेहमी ▪ वर - आशीर्वाद ▪ पंथ - धार्मिक संघटना ▪ संप्रदाय - परंपरा, पंथ ▪ वसूदे - राहूदे ▪ सकल - सगळे ▪ मानवता - माणुसकी ▪ सर्वस्थळी - सर्व ठिकाणी ▪ समुदाय - समूह ▪ शीलवान - चारित्र्यसंपन्न ▪ अस्पृश्यता - जातिभेद ▪ समूळ - मुळापासून ▪ खल - दुष्ट ▪ निंदक - निंदा करणारे ▪ रमो - आनंदात राहणे ▪ विपत्ती - संकट ▪ तुकडयास - संत तुकडोजी महाराजांना

## स्वाध्याय

प्र.1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

(1) या भारतात नित्य काय वसू दे ?

(2) सर्व संप्रदाय कसे दिसावेत ?

(3) अमीर गरिबांनी कसे रहावे ?

(4) सर्वस्थळी कोणती प्रार्थना व्हावी ?

(5) उद्योगी तरुण कसा असावा ?

(6) अस्पृश्यता या जगातून कशी नष्ट व्हावी ?

(7) सत्य न्याय कुठे वसावा असे कवीला वाटते ?

(8) सौंदर्याने कुठे रमले पाहिजे ?

प्र.2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

(1) हे सर्व पंथ ............ एक दिसू दे.

(2) नांदोत सुखे ............ एक मतानी.

(3) ............ या सकलामाजी वसू दे.

(4) ............ विसरुनिया एक हो आम्ही.

(5) ............ रमो घराघरात स्वर्गीयापरी

(6) ............ सदा या सवेमाजी वसू दे.

प्र.3 खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.

(1) देशात बंधुभाव राहण्याविषयी कवी काय म्हणत आहेत ?

(2) उद्योगी तरुण कसा असला पाहिजे? का ?

(3) खल निंदकाच्या मनीही सत्य न्याय का वसावा ?

प्र.4 खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा वाक्यात लिहा ?

(1) देशातील सकलास मानवता कळू दे असे कवी का म्हणत आहे ?

(2) मानवता, राष्ट्रभावना सगळ्यांस कळल्याने काय होईल ?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्र.5 खालील ओळींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा।

(1) ''नांदोत सुखे गरीब अमीर एकमतांनी''
(2) ''हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना''
(3) ''खलनिंदका मनीही सत्य, न्याय वसू दे''

प्र.6 खालील प्रश्नाचे उत्तर सात ते आठ वाक्यात लिहा.

(1) भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?

## भाषाभ्यास

(1) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन समास ओळखा
गरीब-अमीर, राष्ट्रभावना, अस्पृश्य, समूळ, खल - निंदक

## उपक्रम

- 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर 15 ओळी निबंध लिहा.
- संत तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' मिळवून वाचा.

## शुद्धलेखन :

पुढील शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| मीमांसा | तीक्ष्ण | कीर्तन |
| जीव | गुंतवणूक | |
| लग्नपत्रिका | | |

*****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# व्याकरण, लेखन विभाग

## अलंकार –

अलंकार म्हणजे काय ? त्याचे गुणधर्म कोणते ? याचा अभ्यास करुन सुरुवातीच्या काही अलंकारांच्या प्रकारांचा आपण मागील इयत्तेत अभ्यास केला आहे.

आपल्याला 10 वी च्या अभ्यासक्रमातील अर्थान्तरन्यास अन्योक्ती, दृष्टान्त, स्वभावोक्ती, चेतनगुणोक्ती, विरोधाभास इ. अलंकारांचा अभ्यास करावयाचा आहे.

(1) अर्थान्तरन्यास - पुढील ओळी वाचा

''बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल।

श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ''

(खल - दुष्ट ; अहि - साप ; गरल - विष)

अर्थ - दुष्ट माणसाला कितीही चांगला उपदेश केला तरी त्याला तो आवडत नाही. सापाला पाजलेल्या दुधाचे विषातच रुपांतर होते हे सांगून झाल्यानंतर जीवनात येणारा हा अनुभव 'कुत्र्याची शेपटी नळीत घातली तरी ती वाकडीच राहणार' या अर्थाच्या वरील वाक्याने सर्वसामान्य सिद्धान्ताच्या स्वरुपात मांडली आहे.

'मरणात खरोखर जग जगते' किंवा 'जन पळभर म्हणतिल हायहाय' या कविवर्य तांब्यांच्या कवितांत प्रथम सामान्य सिद्धान्त सांगून त्याच्या समर्थनार्थ विशेष दाखले दिलेले आढळतात. यावरुन एखाद्या सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे किंवा विशेष उदाहरणांवरुन शेवटी एखादा सामान्य सिद्धान्त काढला तर अर्थान्तरन्यास हा अलंकार होतो. (अर्थान्तर - दुसरा अर्थ, न्यास - शेजारी ठेवणे)

- एका अर्थाचा समर्थक असा दुसरा अर्थ त्याच्या शेजारी ठेवणे असाही या अलंकाराचा अर्थ आहे. काही कवींनी आपल्या कवितांत काढलेले काही सामान्य सिद्धान्त पुढे दिलेले आहेत.

(1) एका हाते कधितरि मुली वाजते काय टाळी ?

(2) सावळा वर बरा गौर वधुला।

(3) जातीच्या सुंदरांना काहीही शोभते.

(4) मूळ स्वभाव जाईना.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

(5) का मरणी अमरता ही न खरी ?

(6) अत्युच्ची पदि थोरही बिघडतो हा बोल आहे खरा.

(2) **अन्योक्ती –** अन्योक्ती म्हणजे अन्याला (दुसऱ्याला) उद्देशून केलेली उक्ती (बोलणे). कित्येक वेळा स्पष्टपणे एखाद्या व्यक्तीला बोलता येत नाही. अशावेळी ज्याच्याबद्दल बोलायचे आहे त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुसऱ्याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत तिलाच 'अन्योक्ती' अलंकार म्हणतात.

**उदाः** येथे समस्त बहिरे बसतात लोक
का भाषणे मधुर तू करिशी अनेक
हे मूर्ख यास किमपिही नसे विवेक
रंगावरूनी तुजला गणतील काक।

कवी या कवितेत कोकिळेला उद्देशून बोलत आहे. कोकिळेचे निमित्त करुन कवी जरी काही म्हणत असला तरी अरसिक जगापुढे आपल्या कलेचे प्रदर्शन करणाऱ्या रसिकाला उद्देशून त्याला बोलायचे आहे. जग कलेचे चीज न करता बाहय स्वरुपावरुन त्याची किंमत करत असते. हे येथे मोठया खुबीने व्यक्त केले आहे.

दुसऱ्याला उद्देशून बोलून आपले मनोगत व्यक्त करण्यांच्या पद्धतीला 'अन्योक्ती' असे म्हणतात या अलंकारात कवी प्रस्तुताबद्दल (ज्याला बोलायचे त्याच्याबद्दल) न बोलता अप्रस्तुतांना (इतरांना) उद्देशून बोलत असतो म्हणून अन्योक्ती ला अप्रस्तुत प्रशंसा असेही म्हणतात उदा.

'लेकी बोले सुने लागे'

''सांबाच्या पिंडीते बससि अधिष्ठून वृश्चिका, आज
परि तो आश्रय सुटतां खेटर उतरील रे तुझा माज''

(3) **दृष्टांत :** एखाद्या विशेष गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी दुसऱ्या विशेष गोष्टीचे (त्याच अर्थाचे) उदाहरण दिले जाते, तेव्हा हा अलंकार होतो. दृष्टान्तात सादृश्यता असते पण ते दाखविणारे साम्यवाचक शब्द नसतात.

**उदा :** (1) ''लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा।।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार''

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(2) न कळतापद अग्निवरी पडे । न करि दाह असे न कधी घडे ।।
अजित-नाम वदो भलत्या मिसे । सकल पातक भस्म करीतसे ।।

(4) **स्वभावोक्ती :** एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे, त्याच्या स्वाभाविक स्थितीचे यथार्थ हुबेहूब, पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन असते तेथे स्वभावोक्ती अलंकार असतो एखाद्या गोष्टीचे हुबेहूब वर्णन असले म्हणजे हा अलंकार होतो.

**उदा :** (1) गणपत वाणी विडी पिताना, चावायचा नुसतीच काडी ;
म्हणायचा अन् मनाशिच की, हया जागेवर बांधिन माडी
मिचकावुनी मग उजवा डोळा, आणि उडवुनी डावी भिवई ;
भिरकावुनि ती तशिच द्यायचा, लकेर बेचव जैशी गवई.

या ओळीत कवीने गणपत वाण्याचे हुबेहुब चित्र शब्दांनी रेखाटले आहे. अगदी त्याच्या डोळे मिचकावण्याचे वर्णनही जसेच्या तसे आहे.

(2) मातीत ते पसरले अतिरम्य पंख।
केले वरी उदर पांडुर निष्कलंक।।
चंचू तशीच उघडी पद लांबवीले।
निष्प्राण देह पडला श्रमही निमाले।।

(5) **विरोधाभास :** एखाद्या विधानात वरवर दिसायला विरोध आहे असे वाटते ; पण वास्तविक तसा विरोध नसतो अशा ठिकाणी 'विरोधाभास' हा अलंकार असतो. या विरोधाचा परिहार (-निराकरण) करता येतो. यात खरोखर विरोध नसून विरोधाचा आभास निर्माण केलेला असतो.

**उदा :** (1) जरी आंधळी मी तुला पाहते.
(2) वियोगार्थ मीलन होते नेम हा जगाचा
(3) तुजसाठी मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण
(4) सर्वच लोक बोलू लागले की कोणीच ऐकत नाही.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदा 1 : येथे वरवर पाहता आंधळी आणि पाहणे हा विरोध वाटतो पण अंत चक्षुंनी पाहते हा अर्थ अभिप्रेत आहे.

(6) **चेतनगुणोक्ती :** निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करुन ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे 'चेतनगुणोक्ती' हा अलंकार असतो.

**उदा :** (1) ती पहा, सर्वात मागे आपली मान उंचावून आकाशाची निळाई पाहणारी टेकडी.वरील उदाहरणात टेकडी अचेतन आहे ती मान उंचावून आकाशाची निळाई पाहते. असा अलंकार वर्णिला आहे.

(2) आला हा दारि उभा वसंत फेरीवाला,
पोते खांद्यावरि सौद्याचे। देईल ज्याचे त्याला.

(3) अरे वेडया सोनचाफया। काय तुझारे बहर.
नाही पाहिलीस माझी। चाफेकळी सोनगौर.

(4) चाफा बोलेना, चाफा चालेना,
चाफा खंत करी, काही केल्या फुलेना !

******

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# वृत्ते

आठवी व नववीच्या पाठ्यपुस्तकातून आपण कांही वृत्तांचा अभ्यास केला आहे. यावर्षी-शिखरिणी, मंदाक्रांता, मंदारमाला, सुमंदारमाला या अक्षरगणवृत्तांचा तसेच आर्या, अभंग व ओवी या जाती (मात्रा) वृत्तांचा आणि 'मुक्तछंद' या प्रकारांचा अभ्यास करावयाचा आहे.

**1. शिखरिणी :**

पहा सह्याचीच प्रखर गिरिराजी शिखरिणी

पहास / ह्याचीच /प्रखर / गिरिरा /जीशिख / रिंणी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम | U _ _ | _ _ _ | U U U | U U _ | _ U U | U _ |
| | य | म | न | स | भ | ल ग |

वृत्त - शिखरिणी.

लक्षणे -

(1) अक्षरे - 17

(2) यती - 6 व 12 व्या अक्षरांवर

(3) गण - य, म, न, स, भ, ल, ग

**2. मंदाक्रांता :**

मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी

मेघांनी/ हेगग / नभर / तागाढ / आषाढ / मासी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| लगक्रम | _ _ _ | _ U U | U U U | _ _ U | _ _ U | _ _ |
| | म | भ | न | त | त | गग |

वृत्त - मंदाक्रांता

लक्षणे -

(1) अक्षरे - 17

(2) यती - 4 थ्या व 6 व्या अक्षरांवर

(3) गण - म, भ, न, त, त, ग, ग

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 3. मंदारमाला :

वीणा करी मंजु झंकार हाती, असे शारदा ही जगन्मोहिनी

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वीणाक / | रीमंजु / | झंकार / | हातीअ / | सेशार / | दाहीज / | गन्मोहि / | नी |
| लगक्रम | – – ∪ | – – ∪ | – – ∪ | – – ∪ | – – ∪ | – – ∪ | – – ∪ | – |
| | त | त | त | त | त | त | त | ग |

वृत्त - मंदारमाला

लक्षणे -

(1) अक्षरे - 22

(2) यती - 4, 10 व 16 व्या अक्षरांवर

(3) गण - त, त, त, त, त, त, त, ग

## 4. सुमंदारमाला :

मराठी असे आमुची मायबोली, जरी भिन्न धर्मानुयायी असू.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी / | असेआ / | मुचीमा / | यबोली / | जरीभि / | नधर्मा / | नुयायी / | असू. |
| लगक्रम | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – – | ∪ – |
| | य | य | य | य | य | य | य | लग |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

वृत्त - सुमंदारमाला.

लक्षणे -

(1) अक्षरे - 23

(2) यती - 5, 11 व 17 व्या अक्षरांवर

(3) गण - य, य, य, य, य, य, य, ल, ग

टीप - मंदारमालेच्या आरंभी लघु अक्षर आले की 'सुमंदारमाला' हे वृत्त होते.

### मात्रा–वृत्त (जाती)

**व्याख्या –** ''ज्या कवितेच्या चरणात अक्षरांचे व गणाचे बंधन नसून केवळ मात्रांचे बंधन असते, त्यास 'मात्रावृत्त' किंवा 'जाती' म्हणतात''. यामध्ये लघुसाठी एकमात्रा' तर गुरुसाठी दोन मात्रा मोजतात.

या मात्रावृत्तात अनेक प्रकारच्या पद्य रचना आढळतात.

विशेषतः फटके, अंगाई-गीत, पाळणे, भूपाळया, आरत्या, समरगीते, लावण्या यांचा, यात समावेश होतो.

(1) आर्या : संस्कृतमध्ये ज्याला 'गीती' म्हणतात, त्या पद्य प्रकारास मराठीत 'आर्या' म्हणतात. मोरोपंताच्या आर्या प्रसिद्ध आहेत.

उदा: सुश्लोक वामनाचा। अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची।।
ओवी ज्ञानेशाची। तैशी आर्या मयूरपंताची।।
22 2222 22 22 121222

मात्रा - 12 + 18

## अभंग

अभंगाचे प्रकार दोन आहेत.

(1) मोठा अभंग

(2) लहान अभंग

(1) **मोठा अभंग** - यात एकूण चार चरण असतात. पहिल्या तीन चरणात 6 किंवा 8 अक्षरें असतात व चौथ्या चरणात 4 अक्षरें असतात.

उदा : (1) देवाचिया द्वारी। उभा क्षण भरी।
तेणे मुक्ति चारी। साधियेल्या।। - ज्ञानेश्वर

(2) लक्ष्मण भावोजी। मागे, पुढे स्वामी।
मज आहे धामी। ऐसे वाटे।।

(2) **लहान अभंग :** लहान अभंगात दोन चरण असतात. प्रत्येक चरणात आठ अक्षरें असतात.

उदा : मुखी बोले ब्रह्मज्ञान। मनी धन अभिमान।।

## – ओवी –

ओवीला चार चरण असतात. पहिल्या तीन चरणाच्या शेवटी यमक असते. अलिकडच्या ओव्यात प्रत्येकी 8 अक्षरांचे चार चरण असतात. दुसऱ्या व चौथ्या चरणात यमक जुळविलेले असते.

अभंग व ओवी हे दोन्ही छंद सारखेच आहेत. अभंगाच्या तिन्ही चरणात बहुतेक सारखीच अक्षरें असतात अभंगाच्या शेवटी कवीचे नाव आढळते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

उदा : (1) पहिली माझी ओवीगं। पहिला माझा नेंम।
तुळशीखाली राम। पोथी वाची।।

(2) भ्रताराच्या राज्यी। उणे ठेवीना रे देव।
बहिणीच्या मनी। चोळीची आशा ठेव।।

## – मुक्तछंद –

''अक्षरसंख्या, लघु-गुरुक्रम, मात्रा, यमक यासारखे कोणतेच बंधन नसलेल्या रचनेला 'मुक्तछंद' म्हणतात''

'मुक्तछंद' काव्य प्रकारात ओळींचे बंधन नसते. कल्पना, विचार किंवा भावना पुरी झाली की कडवे संपते. मुक्तछंद हा लयबद्ध व संथपणे वाचावयाचा असतो. वाचन आघात प्रधान असते. 'मुक्तछंद' हा काव्यप्रकार कवी अनिल यांनी मराठीत आणला.

उदा : (1) माझा शब्द = एक गोणपाट
कोनाडयात पडलेले
पडलेच उपयोगी
तर कधीमधी घर पुसायला
किंवा पाचोरा.

(2) कधी पाहतो
मी माझ्यातच विराट मानव
पावलांतुनी उमले ज्याच्या उषाच अभिनव
हिमालयापरि देह जयाचा
मुकुट शिरावर रविकिरणांचा
पवित्र गंगा स्फुरते त्याच्या वक्षामधुनी.

******

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# मराठीतील ‘म्हणी’ आणि त्यांचे अर्थ

केव्हा केव्हा आपल्या बोलण्यात छोटी चटकदार व बोधप्रद अशी वाक्ये वारंवार येतात. व अशी वाक्यें सतत वापरात असतात. लोकांच्या म्हणण्यात येणारी, म्हणून अशा वाक्यांना ‘म्हण’ असे म्हणतात.

‘म्हण’ हा शब्द संस्कृत ‘भण’ म्हणजे - ‘‘सांगणे किंवा म्हणणे’ होय.

लोकांच्या सतत वापरात येणाऱ्या छोटया वाक्यांना तोंडचे वाङ्मय किंवा अनुभवाचे बोल अथवा अनुभवाच्या खाणी, असे म्हणतात.

व्याख्या - ‘‘सर्वांच्या बोलण्यात सतत येणारे चिमुकले चटकदार,
बोधप्रद व सर्वमान्य वचन म्हणजे ‘म्हण’ होय.’’

‘म्हणी’ या लोकजीवन व लोकहिताचे आरसे असतात. हजारो वर्षांच्या अनुभवातून पूर्वजांनी मोजक्या शब्दांत व्यक्त केलेले सामूहिक शहाणपण असते. मानवी वृत्ती व प्रवृत्ती यांचा ‘म्हण’ हा चिरंजीवी उद्‌गार असतो.

कोणत्याही भाषेचे वैभव हे त्या भाषेतील ‘म्हणी’ व वाक्प्रचार अथवा वाक्संप्रदाय किती समर्थ व श्रीमंत आहेत, त्यावर अवलंबून असते. त्यात सामान्यांच्या जीवनातील ‘पूर्ण सत्य’ भरलेले असते.

‘म्हणी’ या मौखिक वाटचाल करीत साहित्यात आल्या आहेत. म्हणीत अनुभवांचे अमृत ठासून भरलेले असते. त्यात प्रास, प्रासादिकता यांचा सुंदर संगम साधलेला असतो. म्हणींच्या योग्य वापरामुळे बोलण्यात व लिखाणात अचूकता व सामर्थ्य येते.

**उदा :**

(1) अति तेथे माती.
(2) कर चाकरी, खा भाकरी
(3) कामापुरता मामा, ताकापुरती आजी.
(4) देश तसा वेष.
(5) खाण तशी माती.
(6) थांबला तो संपला.
(7) जशास तसे.
(8) जुने ते सोने.
(9) गळयात माळा, पोटात काळा.
(10) अचाट खाणे, मसणात जाणे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

यासारख्या म्हणी मनाचा, काळजाचा ठाव घेतात. कानात रुंजी घालतात. जीवनाला अर्थ प्राप्त करुन देतात.

मराठीतील इतर काही म्हणी व त्यांचे अर्थ -

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | अति शहाणा, त्याचा बैल रिकामा | (1) | अति चिकित्सा केल्याने हाती काहीच लागत नाही. |
| (2) | असतील शिते, तर जमतील भुते | (2) | जोपर्यंत आपल्याकडे पैसा आहे तोपर्यंत अनेक माणसें गोळा होतात. |
| (3) | अति तेथे माती ............. | (3) | कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच असतो. |
| (4) | आयत्या बिळात नागोबा ........ | (4) | स्वतः कष्ट न करता फायदा मिळविण्याची वृत्ती. |
| (5) | आवळा देऊन, कोहळा काढणे ... | (5) | अल्प मोबदल्यात जादा फायदा घेणे. |
| (6) | आडात नाही, तर पोहऱ्यात-कोठून येणार ? | (6) | स्वतःजवळच नसेल तर दुसऱ्याला कोठून देणार? |
| (7) | असंगाशी संग, प्राणाशी गाठ. | (7) | दुष्टांची संगत फार घातक ठरु शकते. |
| (8) | आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळे. | (8) | अपेक्षापेक्षा जास्त मिळणे. |
| (9) | उचलली जीभ, लावली टाळयाला | (9) | अविचारीपणे बोलणे. |
| (10) | ऊस गोड लागला म्हणून, मुळासकट खाऊ नये. | (10) | उपकारकर्त्याला त्रास दिल्याने, आपलेच नुकसान होते. |
| (11) | एक घाव, दोन तुकडे ............. | (11) | त्वरित निर्णय घेणे. |
| (12) | एका हाताने टाळी वाजत नाही | (12) | दोष एकाचाच नसतो. |
| (13) | करावे तसे भरावे ............. | (13) | आपल्या कुवतीप्रमाणे फळ मिळते. |
| (14) | एक ना धड भाराभर चिंध्या .... | (14) | एकाचवेळी अनेक गोष्टी केल्याने फायदा होत नाही, उलट काम बिघडते. |
| (15) | कर नाही त्याला डर कशाला ? | (15) | अपराध केला नसेल तर शिक्षेची भीती नसते. |
| (16) | कडू कारले तुपात तळले साखरेत घोळले तरी कडू ते कडूच | (16) | मुळचीच वाईट गोष्ट कितीही चांगली करण्याचा प्रयत्न केला तरी चांगली होत नाही. |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

| | | | |
|---|---|---|---|
| (17) | कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ... | (17) | आपलाच एखादा नातेवाईक आपलेच नुकसान करतो. |
| (18) | कोळसा कितीही उगाळला तरी काळाच | (18) | वाईट गोष्टीतून काहीही चांगले निघत नाही. |
| (19) | खाई त्याला खवखवे ............ | (19) | अपराध्याच्या मनात केलेल्या अपराधाची जाणीव होणे. |
| (20) | गर्जेल तो पडेल काय ............ | (20) | तोंडाची बडबड करणाऱ्याच्या हातून कांहीही होत नाही. |
| (21) | गरज सरो, वैद्य मरो ............ | (21) | आपली गरज संपली की, उपकार कर्त्याला विसरणे. |
| (22) | गाढवापुढे गाईली गीता, कालचा गोंधळ बरा होता. | (22) | मूर्खाला केलेला उपदेश व्यर्थ ठरतो. |
| (23) | घरोघरी मातीच्या चुली ............ | (23) | सर्वत्र सर्वसाधारणपणे एक सारखीच परिस्थिती असते. |
| (24) | घरचे झाले थोडे अन् व्याहयाने धाडले घोडे. | (24) | आपल्या भरपूर कामात इतरांच्या कामाची भर पडणे. |
| (25) | चोराच्या मनात चांदणे - | (25) | गुन्हेगार माणसाला आपला गुन्हा उघड होईल याची भीती असते. |
| (26) | जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही. | (26) | नेहमीच्या सवयी जन्मभर जात नाहीत. |
| (27) | जेवीन तर तुपाशी, नाहीतर ............ उपाशी. | (27) | मिळाले तर चांगलेच हवे, नाहीतर नकोच. |
| (28) | जावे ज्याच्या वंशा, तेंव्हा कळे ... | (28) | ज्याची अडचण त्यालाच माहीत |
| (29) | ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी. | (29) | उपकारकर्त्याच्या बाजूने बोलावे. |
| (30) | कोरड्याबरोबर ओलेही जळते. | (30) | अपराध्या बरोबर निरापराध्यालाही दोष दिला जातो. |
| (31) | आपला तो बाळया, दुसऱ्याचे ते कार्टे. | (31) | आपल्या गोष्टीं तेवढया चांगल्या वाटतात, पण दुसऱ्याचे दोष दिसतात. |
| (32) | टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही. | (32) | कष्टाशिवाय मोठेपण मिळत नाही. |
| (33) | ढवळयाच्या शेजारी बांधला पवळा, वाण नाही पण गुण लागला. | (33) | संगतीने दुसऱ्याचे गुण घेण्याऐवजी दुर्गुणच मात्र घेतले जातात. |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | | |
|---|---|---|---|
| (34) | तेल गेले, तूप गेले, हाती .....धुपाटणे आले. | (34) | अति लोभामुळे होणारा थोडासा फायदाही हातचा जातो. |
| (35) | भटाला दिली ओसरी, भट-हातपाय पसरी. | (35) | सवलतीचा गैरफायदा घेणे. |
| (36) | रिकामा न्हावी, भिंतीला तुमडया-लावी. | (36) | रिकामा माणूस कांहीतरी उपद्व्याप करीतच असतो. |
| (37) | लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण-कोरडे पाषाण. | (37) | उपदेश करणे सोपे, त्याप्रमाणे वागणे कठ-ीण. |
| (38) | विनाश काले, विपरीत बुद्धी | (38) | वाईट वेळ आली की बुद्धीही तशी होते. |
| (39) | शितावरुन भाताची परीक्षा- | (39) | थोडयाशा चाचणी वरुन सगळया गोष्टींची कल्पना येणे. |
| (40) | सुपातील हसतात् जात्यातील -रडतात. | (40) | इतर संकटात सापडल्याबद्दल हसू नये. कारण आपल्यावरही जात्यात जाण्यायी वेळ येणार असते. |
| (41) | सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही. | (41) | सत्ता, संपत्ती गेली तरी माणसाचा ताठा कायम राहणे. |
| (42) | हातच्या कांकणाला आरसा कशाला. | (42) | प्रत्यक्ष दिसत असलेल्या गोष्टीसाठी पुराव्याची गरज नसते. |
| (43) | आग सोमेश्वरी, बंब रामेश्वरी-(डोळयात केर, कानात फुंकर). | (43) | दुखणे एकीकडे, उपचार भलती कडे. |
| (44) | इकडे आड, तिकडे विहीर . | (44) | चोहोबाजूला संकटेच संकटे. |
| (45) | नाव सोनूबाई, हाती कथिलाचा वाळा. | (45) | केवळ सांगायला श्रीमंती, खरे दारिद्रयच. |
| (46) | नावडतीचे मीठ आळणी . | (46) | तिरस्करणीय माणसाने कितीही चांगल्या गोष्टीं केल्या तरी चांगल्या दिसत नाहीत. |
| (47) | घर फिरले की घराचे वासेही फिरतात. | (47) | कर्त्या माणसावर संकट आले की आश्रित देखिल उलटतात. |
| (48) | ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी. | (48) | एकाच गावातील लोक एकमेकांना चां-गलेच ओळखून असतात. |
| (49) | चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे. | (49) | प्रत्येकाच्या आयुष्यात केव्हातरी चांगले दिवस येतात. |
| (50) | गाढवाला गुळाची चव काय? | (50) | मूर्खाला केलेला उपदेश व्यर्थ ठरतो. |

******

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# सारग्रहण

उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. 'सत्यमेव जयते !' हे स्वतंत्र भारताचे ब्रीदवाक्य आहे भारत राष्ट्राची अस्मिता या वचनात एकवटली आहे. अंतिम विजय सत्याचाच असतो हेच प्रखर सत्य या सुभाषितातून दृष्टीस येते. पुराणकथातून सत्य हे मूल्य ठासून सांगितले आहे. लहानपणापासून आपले आईवडील आपणास 'नेहमी सत्य बोलावे' ही शिकवण देतात. खरे बोलण्याचा संस्कार थोरामोठयांच्या अनेक वचनातून आपणावर घडतो.

   सत्यवचनी व्यक्तीला अनेकदा त्रास होतो त्यांचे यश त्यांच्यापासून दूर जात आहे असे वाटते, पण अंतिम विजय त्याचाच होतो सत्यासाठी रामाने वैभवाचा त्याग केला आणि वनाचा रस्ता धरला रामाचा मार्ग सत्याचा होता आणि रावणाचा मार्ग असत्याचा होता. शेवटी रामाचा म्हणजे सत्याचाच जय झाला.

   प्रश्न :

   (1) भारताचे ब्रीदवाक्य कोणते ?

   (2) पुराणकथातून कोणते मूल्य ठासून सांगितले आहे ?

   (3) अंतिम विजय कोणाचा होतो ?

   (4) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

खालील उताऱ्याचे वाचन करुन त्याखालील प्रश्नांची उत्तरे द्या.

2. साहित्यकला ही शब्दकला आहे. कलेचे उद्दिष्ट असते सौंदर्य निर्मिती करणे व सौंदर्यानुभव आणून देणे. 'सत्य, शिव, सौंदर्य हे साहित्याचे त्रिपदी स्वरुप असते या त्रिपेडी विणीमुळे साहित्य विश्वात्मक पातळी गाठू शकते. शास्त्राची दृष्टी फक्त सत्यदर्शनाकडे असते, सौंदर्यदर्शनाकडे नसते. त्यापेक्षाही शिवत्वाकडे लक्ष देऊन 'सत्यदर्शन' घडवणे तिला मान्य नसते. आजचे विज्ञान असे केवळ सत्याची दृष्टी ठेवून संशोधन करीत सुटल्यामुळे त्या-चा विनाशकारी, केवळ अर्थजन्य, केवळ स्वार्थांध उपयोग करायलाही मानव घाबरेनासा झाला आहे. त्याला मनाच्या सुसंस्कृतीची जोड म्हणजेच शिवाची मदत असली पाहिजे ती मदत सौंदर्याला प्रमुख मानूनही सत्य-शिवाची उपासना जपणारे साहित्य करीत असते. कोणत्याही देशाची संस्कृती साहित्य कलेमुळे जतन केली जात असते.

प्रश्न :

(1) साहित्याचे त्रिपदी रुप कोणते ?

(2) शास्त्राची दृष्टी कशाकडे असते ?

(3) मानव का घाबरेनासा झाला आहे ?

(4) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

## कल्पनाविस्तार

एस. एस. एल. सी. बोर्डाच्या परीक्षेत 'कल्पनाविस्तार करा' असा एक 3 मार्काचा प्रश्न विचारला जातो. त्यामध्ये जी ओळ, जे वाक्य दिलेले असते, प्रथम त्याचा अर्थ स्पष्ट करुन सांगावा. नंतर त्या अर्थाच्या स्पष्टीकरणासाठी इतिहासातील किंवा पुराणातील दोन तीन उदाहरणे द्यावीत. त्यापैकी एका उदाहरणाचे स्प्टीकरण करावे व दुसऱ्या उदाहरणाचा नुसता उल्लेख करावा.यामध्ये दिलेल्या कल्पनेचा शब्दश: अर्थ न घेता त्यातून व्यक्त होणारा अर्थ घेतला पाहिजे.

खाली नमुन्यादाखल दोन उदाहरणे दिलेली आहेत.

### 1) प्रयत्नांती परमेश्वर

वरील कल्पनेत (ओळीत) प्रयत्न केला असता परमेश्वर आपल्याला भेटतो असे म्हटले आहे. इथे प्रत्यक्ष परमेश्वर असे नसून आपल्या कार्यामध्ये यश हे मिळतेच, असा अर्थ आहे. यासाठी उदाहरण म्हणजे एडिसन. या शास्त्रज्ञाने विद्युत दिव्याचा शोध लावला.पण त्यासाठी त्याने अथक प्रयत्न केले होते. जवळजवळ 100 वेळा त्याचे प्रयत्न फसले होते, पण हार न मानता तो प्रयत्न करतच राहिला आणि विज्ञानामध्ये त्या शोधांचे पेटंटही मिळविले.

अशा तऱ्हेचे प्रयत्न डॉ.आंबेडकरांनी शिक्षणासाठी केले होते. ते तर 21 तास वाचत असत. म्हणजे यावरुन प्रयत्नाने आपल्या कार्याचे फळ (परमेश्वर) मिळतेच हे खरे!

### 2) जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण

जीवनात या वचनाचा पुन: पुन्हा आपणास अनुभव येतो. माणसाला मिळालेला मोठेपणा आपल्याला दिसतो, पण ते यश मिळविण्यासाठी त्यांना खूप कष्ट करावे लागतात. महात्मा गांधींचेच उदाहरण आपण घेतले तर, प्रथम त्याना समाजाकडून खूप विरोध झाला होता. पण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी त्यांनी स्वत:च्या प्राणाचीही पर्वा केली नव्हती. त्यांचे प्रयत्न पाहून सगळा भारत देश त्यांच्या पाठीमागे उभा राहिला आणि त्यांना 'महात्मा' म्हणू लागला.अशा प्रकारचे कष्ट बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांची सेवा करताना घेतले होते. प्रथम त्यांना त्या समाजाकडून खूप विरोध झाला. नंतर मात्र त्यांच्या आनंदाश्रमाकरता लोकांनी लाखो रुपयांची मदत केली. पण त्यांच्या सुरुवातीच्या यातना विसरता येणार नाहीत. म्हणूनच म्हणतात ना ''मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो'' मोठेपण हे अतिशय यातना सहन केल्यावरच मिळते.

******

© KTBS NOT TO BE REPUBLISHED